| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक १२८ वा | सोमवार दिनांक २७ जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पात्र शेतकऱ्यांच्या याद्या जाहीर

# जिल्ह्यातील ४६ हजार ४६ शेतकऱ्यांचा समावेश ; कर्जमुक्तीचा लाभ मिळविण्यासाठी दोन दिवसांत आधार प्रमाणीकरणाचे आवाहन

धाराशिव,दि.२५ जुलै (जिमाका) राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत धाराशिव जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांच्या याद्या २४ जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या दुसऱ्या यादीमध्ये जिल्ह्यातील ४६ हजार ४६ थकीत कर्जदार शेतकऱ्यांचा समावेश असून, संबंधित शेतकऱ्यांनी कर्जमुक्तीचा लाभ मिळविण्यासाठी तातडीने आधार प्रमाणीकरण करून ग्रीस्टॅक क्रमांक सादर करावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाने केले आहे.

राज्य शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये या योजनेला मान्यता दिली आहे. या योजनेंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेले आणि १ एप्रिल २०१९ नंतर वितरित झालेले दोन लाख रुपयांपर्यंतचे अल्पमुदत पीक कर्ज कर्जमुक्ती योजनेत समाविष्ट करण्यात आले आहे.तसेच दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी 'वन टाईम सेटलमेंट' (ओटीएस) योजना लागू करण्यात आली आहे.

ज्या शेतकऱ्यांनी ३१ मार्च २०२७ पूर्वी थकबाकीची रक्कम भरल्यास शासनाकडून दोन लाख रुपयांपर्यंतचा लाभ दिला जाणार आहे.नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महा-आयटीने विकसित केलेल्या संगणकीय पोर्टलवर बँकांनी थकीत पीक कर्जदारांची माहिती भरली होती.त्याआधारे २२ जुलै २०२६ रोजी ५३३ शेतकऱ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर २४ जुलै रोजी राज्यातील सुमारे १७ लाख शेतकऱ्यांची दुसरी यादी आधार प्रमाणीकरणासाठी जाहीर करण्यात आली.

धाराशिव जिल्ह्यातील प्रसिद्ध झालेल्या यादीत धाराशिव तालुक्यात ८ हजार ३८, उमरगा ५ हजार २५,कळंब ७ हजार ६७०, तुळजापूर ५ हजार ८७८, परांडा ५ हजार ८४१,भूम ६ हजार २४८, लोहारा २ हजार ११३ आणि वाशी ५ हजार २३३ शेतकऱ्यांचा समावेश आहे.

या याद्या ग्रामपंचायत,तलाठी कार्यालय,चावडी,संबंधित बँक शाखा तसेच विविध मोबाईल गटांवर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.यादीतील प्रत्येक शेतकऱ्याने स्वतःचे आधार कार्ड, यादीतील विशिष्ट क्रमांक आणि ग्रीस्टॅक क्रमांक घेऊन जवळच्या 'आपले सरकार सेवा केंद्रात' जाऊन आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे.ज्या शेतकऱ्यांकडे ग्रीस्टॅक क्रमांक उपलब्ध नसेल,त्यांनी तो सेवा केंद्रातून तत्काळ तयार करून घ्यावा.

सेवा केंद्रावर कर्जाची माहिती, आधार क्रमांक व इतर तपशीलांची पडताळणी करून सर्व माहिती योग्य आढळल्यास संबंधित शेतकऱ्याचे प्रमाणीकरण पूर्ण केले जाईल आणि कर्जमुक्तीचा लाभ देण्यासाठी प्रकरण पुढील प्रक्रियेस पाठविले जाईल.माहितीमध्ये विसंगती आढळल्यास पोर्टलवरून तक्रार नोंदवून ती तहसीलदारांच्या अध्यक्षतेखालील तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडे ऑनलाइन पाठविण्यात येईल. तक्रार नोंदविल्याची पावतीही संबंधित शेतकऱ्याला दिली जाणार आहे.तक्रारीचे निराकरण झाल्यानंतर लाभासाठी प्रकरण शासनाकडे पाठविले जाईल.




ज्या शेतकऱ्यांचे नाव या यादीत नसले,मात्र ३० सप्टेंबर २०२५ रोजी त्यांचे अल्पमुदत पीक कर्ज थकीत असून ते १ एप्रिल २०१९ नंतर घेतलेले असेल,त्यांनी संबंधित बँक शाखेशी संपर्क साधावा.अशा पात्र शेतकऱ्यांची नावे पुढील तिसऱ्या अथवा आवश्यकतेनुसार चौथ्या यादीत समाविष्ट करण्यात येणार असल्याचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,धाराशिव यांनी स्पष्ट केले आहे.

यादीतील सर्व पात्र शेतकऱ्यांनी दोन दिवसांच्या आत आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करून कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळवावा,असे आवाहन जिल्हा उपनिबंधक पी.ए.साठे यांनी केले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६

# कर्जमुक्तीसाठी आधार प्रमाणिकरण अनिवार्य ; शेतकऱ्यांनी दोन दिवसांत प्रक्रिया पूर्ण करावी

धाराशिव,दि.२५ जुलै (जिमाका) राज्य शासनाने २४ जुलै २०२६ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत जिल्ह्यातील ४६ हजार ४६ शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिद्ध केल्या आहेत.या सर्व पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरणाची प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य असून,आधार प्रमाणिकरण केल्याशिवाय कर्जमुक्तीची रक्कम संबंधित कर्ज खात्यात जमा होणार नाही. त्यामुळे यादीतील सर्व शेतकऱ्यांनी पुढील दोन दिवसांत आधार प्रमाणिकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी,असे आवाहन जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, धाराशिव यांनी केले आहे.यासाठी सर्वप्रथम ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय,चावडी कार्यालय तसेच संबंधित बँक शाखांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीतील विशिष्ट क्रमांक,स्वतः




चे आधार कार्ड आणि ग्रीस्टॅक क्रमांक घेऊन शेतकऱ्यांनी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात जावे.तेथे संबंधित केंद्र चालकास विशिष्ट क्रमांक,आधार क्रमांक व ग्रीस्टॅक क्रमांक देणे आवश्यक आहे. ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वी ग्रीस्टॅक क्रमांक घेतलेला नसेल, त्यांनी तो तत्काळ केंद्र चालकाकडून काढून घ्यावा.

शेतकऱ्यांकडून आवश्यक माहिती प्राप्त झाल्यानंतर केंद्र चालक पोर्टलवरील कर्जाची माहिती आणि शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीची पडताळणी करेल.सर्व माहिती अचूक असल्यास आधार प्रमाणिकरणाची प्रक्रिया पूर्ण करून संबंधित शेतकऱ्यांचे प्रकरण पोर्टलवरून कर्जमुक्तीची रक्कम कर्ज खात्यात जमा करण्यासाठी पुढील कार्यवाहीसाठी पाठविले जाईल.


मात्र कर्जाची माहिती,कर्ज खाते किंवा आधार क्रमांक यामध्ये तफावत आढळल्यास त्याबाबतची तक्रार पोर्टलवरच नोंदविण्यात येईल.त्यानंतर तक्रारीचे स्वरूप लक्षात घेऊन ती तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीकडे किंवा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडे पोर्टलमार्फत पाठविण्यात येईल.याची पावती संबंधित शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे.

तक्रार निवारण समित्यांकडून तक्रारीचा निपटारा झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांची फाईल कर्जमाफीचा लाभ मंजूर करण्यासाठी पोर्टलमार्फत शासनाकडे वर्ग करण्यात येईल.

दरम्यान, या संपूर्ण प्रक्रियेबाबतची सविस्तर माहिती दर्शविणारे स्टँडी (डींरपवशश) प्रत्येक आपले सरकार सेवा केंद्रावर प्रदर्शित करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, कीर्ती किरण पुजार यांनी सर्व केंद्रचालकांना दिल्या आहेत.

यादीतील सर्व पात्र शेतकऱ्यांनी कोणताही विलंब न करता आवश्यक कागदपत्रांसह जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन आधार प्रमाणिकरणाची प्रक्रिया दोन दिवसांत पूर्ण करावी,असे आवाहन जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,धाराशिव यांनी केले आहे.

# आषाढी वारीच्या महापूजेचे मानकरी बाबासाहेब माने दांपत्याचा कळंब आगारात जल्लोषात सत्कार !



कळंब (विलास मुळीक ) पंढरपूरच्या आषाढी वारीनिमित्त मुख्यमंत्री यांच्या समवेत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या महापूजेचा मान मिळालेल्या धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील गौरगाव येथील वारकरी बाबासाहेब माधवराव माने व सौ. प्रभावती बाबासाहेब माने यांचा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कळंब आगाराच्या वतीने शुक्रवारी उत्स्फूर्त वातावरणात सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. कळंब आगारप्रमुख विजयकुमार घोलप यांच्या हस्ते माने दांपत्याचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. आषाढी वारीच्या महापूजेचा मान धाराशिव जिल्ह्यातील वारकरी दांपत्याला प्रथमच मिळाल्याने हा संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाचा क्षण ठरला असून सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सत्कार सोहळ्यावेळी कळंब बसस्थानक परिसरात प्रवासी, वारकरी तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेना (शिंदे गट)चे अजित पिंगळे, लक्ष्मीकांत हुलजुते, राज्य परिवहन महामंडळाचे प्रभाकर झांबरे, वाहतूक नियंत्रक हनुमंत मुंडे, चालक बालाजी बोराडे, वाहक बळीराम बोबडे, उमाकांत गायकवाड, अशोक पाटील, महेश थोरबोले, ज्ञानोबा कुंभार, महिला वाहक आशा वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवरांनी माने दांपत्याचे अभिनंदन करून त्यांच्या वारकरी सेवेला सलाम केला.

यावेळी उपस्थितांनी, बाबासाहेब माने दांपत्याला मिळालेला हा सन्मान केवळ गौरगाव किंवा कळंब तालुक्याचाच नसून संपूर्ण धाराशिव जिल्ह्याच्या वारकरी परंपरेचा गौरव असल्याची भावना व्यक्त केली.

***'वीस वर्षांची अखंड पायी वारी अन् विठुरायाची कृपा'***

*बाबासाहेब माने यांनी गेली तब्बल वीस वर्षे कोणत्याही दिंडीचा किंवा वाहनाचा आधार न घेता पत्नी सौ. प्रभावती माने यांच्यासह दरवर्षी पायी पंढरपूरची वारी केली आहे. विठ्ठलावरील अखंड श्रद्धा, निष्ठा आणि सातत्यपूर्ण वारीचेच फळ म्हणून यंदा श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या महापूजेचा मान लाभल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. महापूजेचा मान मिळाल्यानंतर कळंबकडे परतताना योगायोगाने त्यांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची पंढरपूर-कळंब (एमएच-२० बीएल-१९६९) ही बस मिळाली. चालक बालाजी बोराडे व वाहक बळीराम बोबडे यांनी त्यांचे मनापासून स्वागत करून प्रवास संस्मरणीय केला. या प्रसंगाने सत्कार सोहळ्याला आणखी भावनिक आणि संस्मरणीय स्वरूप प्राप्त झाले.*

# ऑनलाईन आर्थिक फसवणुक झालेली एकुण रक्कम १९,००,०००/- फिर्यादींना परत करण्यात धाराशिव सायबर पोलीसांना यश

धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- सायबर पोलीस ठाणे, धाराशिव येथे धाराशिव जिल्हयातील फिर्यादी नामे श्री. मोहित सिध्देश्वर भुजबळ व रोहित सिध्देशवर भुजबळ दोघे रा. वत्सलानगर, अणदुर, धाराशिव यांनी त्यांचे अनुक्रमे १४,००,०००/- व ५,००,०००/- अशी एकुण १९,००,०००/- रु. ची ऑनलाईन आर्थिक फसवणुक झालेबाबत एनसीसीआर पोर्टलवर ऑनलाईन तक्रार नोंदवली होती. त्यानंतर सायबर पोलीसांनी तात्काळ संबंधित बँक यांचेशी पत्रव्यवहार करुन आरोपींच्या विविध बँक खात्यात वर्ग झालेले सर्व बँक खाते गोठविले होते. त्यानंतर सायबर पोलीसांनी संबंधित बँकाच्या नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क करुन फसवणुक झालेली रक्कम अनु. १४,००,०००/- व ५,००,०००/अशी एकुण १९,००,०००/- रुपये फिर्यादींना परत करण्यात धाराशिव सायबर पोलीसांना यश आले आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, रितु खोखर मॅडम. व . अपर पोलीस अधीक्षक, सचिन पांडकर सो. यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोस्टेचे पोनि सचिन यादव, सपोनि/कासुळे, पोअं/ ६४० सुर्यवंशी, पोहवा /११२९ हालसे, पोअं / १०३६ जाधवर, मपो अं/ ७१८ शेख, पोअं / १६५ बिराजदार, पोअं / ८० गाडे पोअं / ९७१ शिंदे सर्व नेमणुक सायबर पोस्टे, धाराशिव यांनी केली आहे. सायबर पोलीस ठाणेच्या वतीने सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही अनोळखी मोबाईल क्रमांकावरुन मेसेज/लिंक/फोन/ क्यू आर कोड आल्यास खात्री केल्याशिवाय आपल्या बँक खात्याशी संबंधित कोणतीही माहिती व ओटीपी फोनदवारे देवु नये किंवा लिंकवर क्लिक /क्यू आर कोड स्कॅन करु नये. तसेच सायबर गुन्हा घडल्यास नागरिकांनी तात्काळ हेल्प लाईन क्रं १९३० वर कॉल करुन सायबर गुन्हयाची माहिती दयावी किंवा www. cybercrime.gov.in या ऑनलाईन पोर्टलवर तक्रार नोंदवावी किंवा सायबर पोलीस ठाणे, धाराशिव येथे तात्काळ संपर्क करावा.

## अंबाबाईच्या मंदिरात चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि २३.०७.२०२६ रोजी अज्ञात व्यक्तीने अंबाबाई मंदीर पिंपळगाव डोळा ता. कळंब जि. धाराशिव येथील मंदीराचे गांभाऱ्याचे दरवाजा उघडून ३ ग्रॅम सोन्याचे दागिने व ७भराचा कंबरपट्टा असे एकुण ३८,००० किंमतीचा माल चोरुन नेला अशा मजकुराच्या फिर्यादी संपत गोरोबा घोटकर,(गोधंळी), वय ६४ वर्षे, रा. पिंपळगाव डोळा यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा गुन्हा नोंदवला आहे.

## क्राईम न्युज

### पोलिसांची जुगार विरोधी कारवाई

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गतजुगार विरोधी कारवाई दरम्यान वाशी पोलीसांनी दि.२४.०७.२०२६ रोजी वाशी पोलीस ठाणे हद्दीत चांदवड येथे ग्रामपंचायत शेजारी अंगणवाडीचे खोलीचे पुर्व बाजूस आडोशाला छापा टाकला. यावेळी पांडुरंग , वय ५० वर्षे, विकास , वय ५१ वर्षे, पंडीत वय ५० सर्व रा. चांदवड ता. भुम जि. धाराशिव हे १५.३० वा. सु. चांदवड येथे ग्रामपंचायत शेजारी अंगणवाडीचे खोलीचे पुर्व बाजूस आडोशाला तिरट मटका जुगाराचे साहित्य असा एकुण ८७० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले वाशी पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा नोंद

लोहारा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत शैलेश वय ३१ वर्षे, रा. रेबे चिंचोली ता. लोहारा जि. धाराशिव यांनी दि.२४.०७.२०२६ रोजी होळी तांडा चौकामध्ये रोडवर लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे लोखंडी तलवार ही विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेले लोहारा पोलीसांना मिळून आले. यावर पथकाने नमुद लोखंडी तलवार जप्त करुन फिर्यादी नामे-प्रशांत तानाजी साखरे, पोलीस अंमलदार नेमणुक पोलीस ठाणे लोहारा यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४,२५ अन्वये लोहारा पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### ट्रॅव्हल्स बसवर चढून केली चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अनुराग रणछोडलाल राठोड, वय ३४ वर्षे, रा.मेघनबर ता. मेघनगर, जि. झाबुआ मध्येप्रदेश हे व साक्षीदार असे लग्झरी ट्रॅव्हल्स मधून जात असताना दि.२४.०७.२०२६ रोजी वाशी फाटा ते पारगाव टोलनाका दरम्यान अज्ञात व्यक्तीने ट्रॅव्हल्स वर चढुन फिर्यादीचे तीने बॅग मधील १५,००० रोख रक्कम व आर्टिफिशल ज्वेलरी, राहुल मांगीलाल राठोड यांचे तीन बॅगमधील १८,००० रोख रक्कम व आर्टिफिशल ज्वेलरी,अंकलेश कांतीलाल राठोड, यांचे बॅगमधील ५०००, पवन दिलीप राठोड यांचे बॅग मधील ५,००० असा एकुण ६३,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अनुराग राठोड यांनी दि.२४.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा! झाडे जगवा!! झाडे तोड रोखा !!!**

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## राजीनाम्यामुळे समस्या सुटतील का?

शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. नीट पेपरफुटीसाठी त्यांना जबाबदार धरत जंतर मंतरवर ३६ दिवसांपासून आंदोलन सुरू होते. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय आम्ही दुसरे काहीही स्वीकारणार नाही, असे आंदोलकांनी म्हटले होते. प्रधान यांच्या राजीनाम्याबद्दल दीपक म्हणाले, लोक म्हणायचे की या सरकारमध्ये राजीनामे होत नाहीत. झुकती है दुनिया, झुकाने वाला चाहिए. दीपक पुढे म्हणाले, धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. जर तुम्ही घाबरत नसाल, जर तुम्ही या सरकारपुढे झुकत नसाल, तर तुम्ही कोणाचाही राजीनामा घेऊ शकता, याचा हा पुरावा आहे. लोकशाहीत घाबरण्याची गरज नाही. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर कॉकरोच जनता पक्षाने (सीजेपी) प्रतिक्रिया दिली आहे. 'कॉकरोच जिंकले, लोकशाही जिंकली' असे सांगणारे एक निवेदन पक्षाने प्रसिद्ध केले आहे. वास्तविक राजीनामा हा एक इगो होता. वास्तविक परिक्षा मग कोणती का असत नाही. ती एक प्रकिया आहे. यापुर्वीही असे प्रकार घडले होते. अनेकवेळा पेपरलिक होण्याचे प्रकार उघडे पडले आहेत. नीटच्या परिक्षापुर्व असा प्रकार घडला असे नाही. मुळात दिल्लीत जे आंदोलनकर्ते होते या बाबत व्यवस्थित अभ्यासले पाहिजे. आज प्रधान यांचा राजीनामा घेतला गेला याचा अर्थ एक पावले सरकार मागे हटले आहे असाच समजावा लागेल. सरकार मधील शिक्षणमंत्र्याचा राजीनाम का मागितला, पंतप्रधानाचा का नाही. पुर्ण सरकारचा नाही तर केवळ शिक्षण मंत्र्याचा राजीनामा मागण्यामागे एक गुपीत कारण असू शकते. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून जुनी शिक्षण पद्धती शिकवली जात होते. यात प्रधान यांनी बदल करण्याचा प्रयत्न केला. परदेशिय संस्कृती व हिंदुस्थान विरोधी लोकांचा इतिहास, परकियांचा इतिहास आज पर्यंत शिकविला जात होता. वास्तविक याची काही गरज नव्हती. मोगलाचा इतिहासाची गरज नव्हती. कारण आपल्या भारतात अनेक शुरवीर जन्माले आले. गौरवशाली इतिहास असताना तो लपविला गेला. नको त्यांचा इतिहास शिकविला जात होता. अनेक पुस्तकात तीच त्या बाबी होत्या. मेकाले शिक्षण पद्धतीचा प्रभाव होता. तो बदलला तर लबाडांची पोळी भाजणे शक्य होते. देशविरोधी मंडळी एकत्र येवून बदलाचा विरोध केला. भारताविरोधात कितीही षडयंत्र रचले तरी भारतीयांचा गौरवशाली इतिहास पुसला जावू शकत नाही. त्याचा तसा प्रयत्न केला तरी ते शक्य नाही. भारतीयांची शरिर पोलादी आहे. कितीही अयोग्य प्रयोग केला तर ते शक्य होणार नाही. मुळात आंदोलनकर्त्याचा इतिहास अभ्यासला पाहिजे. देशात आज पर्यंत मुंबई हल्ला असो किंवा संसदेवर हल्ला करणारे असोत. त्यापेक्षा पहलगाम मधील हल्ला असोत यामागे काही तरी कारण लपलेले आहे. स्थानिकांचा हात असल्याशिवाय देशविरोधी कारवाई यशस्वी होत नाही. देशात आज जेवढे देशविरोधी काम करणारे पकडले गेले ते उच्च शिक्षित समजले जाणारे होते. उच्च ज्ञानी होते, कारण त्यांना तसे शिक्षण व ज्ञान मिळाले होते. त्यामुळे शिक्षण सर्वात महत्वाचे आहे. शिक्षणाच्या चुकीच्या बाबी, पैलू बदलण्याची गरज होती तेच काम सरकारकडून होत होते. असे असताना केवळ प्रधान यांना टार्गेट करणे योग्य नव्हते. एक बाब लक्षात येते. आज परदेशिय ताकद जिंकली आहे. जे संघटन राजीनाम्याची मागणी करीत होता तो कोण व त्यामागील इतिहास प्रत्येक भारतीयांनी समजुन घेतला पाहिजे. आज देशात अशांतता माजविण्याचा पद्धतशीर प्रयत्न सुरू आहे. तो घातक आहे. यामुळे अनेक बाबी समजुन घेणे अपेक्षित आहेत. प्रधान यांचा राजीनाम घेणे किंवा त्यांनी देणे हा पेपरलिक प्रकरणाचा तसा काही संबंध? राजीनाम्यामुळे जे आंदोलनकर्ते होते त्यांची ताकद वाढली असेच काम झाले. वास्तविक यात जय किंवा पराजयाच्या बाबी नाहीत, यातून काय निष्पन्न होणार किंवा केले गेले आहे. राजीनामा घेणे हा ईगो होता. राजीनामा घेणे ही जिद्द होती. आता यापुढे पेपर लिक होणार नाही कशावरून? वास्तविक जे पकडले गेले त्यांना सोडून देणार कारण शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा दिला आहे असेच समजावे का? मुळात वरचेवर देशात देशविरोधी संघटन कार्यरत आहे. त्यांची ताकद वाढती आहे ही एकबाब देशासाठी घातक आहे. वास्तविक नीट परिक्षा पेपरलिक व राजीनामा याचा संबंध नसताना जोडला गेला आहे. बाहेरच्या देशातून एक व्यक्ती येतो कसा, आंदोलन करतो कसा व सरकारला झुकायाला लावतो कसा हे चित्र जनतेनी आता पाहिले आहे. जनतेला काही बाबी निश्चित कळाल्या असतील. जे देशात चालते ते विरोधीक एक नाही तर सर्वजनच एकत्र येवून चिथावणीखोरपना कसा पाठींबा दर्शवितात. हे ज्वलंत उदा. पाहावयाय मिळाले आहे. परदेशातून येणाऱ्या फंडींगवर काहीही करता येते ही बाब नवीन नाही. असे प्रकार घडेलेले आहेत व यानंतरही घडणार आहे. अविचाराने अनेकांनी सत्ताधाऱ्याची जिरवण्यासाठी केलेला केविलवाणी प्रकार पाहायला मिळाला आहे. आंदोलन व्हावीत मात्र आंदोलनकर्त्याचा प्रामाणिक इतिहास असला पाहिजे. देशात अनेक जुने, वयोवृद्ध बुद्धीमान मंडळी असताना परदेशाकडून आंदोलने उभी केली जातात. परदेशायाकडून यशस्वी करून घेतात. देशात विरोधी पक्षात स्वतःची ताकद आता कळून आली आहे. देशात जे घडले ते नेपाळ व बांगला देशात जे घडले तोच प्रकार करण्याचा डाव असला पाहिजे असे चित्र सध्याला दिसून आले आहे. देशात अनेक बाबी आहेत. देशात कडक धोरणाचा अभाव आहे, त्यामुळे चुकीच्या माणसाचे चालत आले आहे. चीनला भारतानंतर स्वराज्य मिळाले. आज चीनची प्रगती कडक धोरणामुळे झाली आहे. चीन, अमेरिका किंवा रशिया आदि देशात बाहेरच्या व्यक्तीला त्या देशातील नागरिक साथ देत नाहीत. भारतात मात्र चुकीच्या लोकांचे फावले जात आहे. प्रधान यांचा राजीनामा नाही तर बदलणारी शिक्षण पद्धतीवर घाला आहे. शिक्षण पद्धतीत बदलाचे वारे मंदावणार आहे. भारतीय गौरवशाली इतिहास, नवा भारत शैक्षणिक माध्यमातून विद्यार्थ्यांच्या हाती येणार होता तो आता येणार का नाही या बाबत शंका आहे. जे विरोधकांना अपेक्षित होते तेच यशस्वी झाले आहे. त्यामुळे भारतीयांनो विचार करा. जागे व्हा!झोपेचे सोंग घेणार असला तर झोपेत संपणार आहात, अशी शंका निर्माण होत झालेली आहे. प्रधानाचा राजीनाम हा विरोधकांचा विजय नाही तर परदेशातून मिळणाऱ्या व देणाऱ्या व्यक्तीचा विजय आहे. राजीनामा हा पर्याय नाही तर झुकावयाला लावणे हा तुच्छ हेतू हेच सिद्ध होते.

# आषाढी एकादशी आपलं लातूर ग्रीन फाउंडेशन च्या वृक्ष व कापडी पिशवी प्रसाद वाटप उपक्रमात पर्यटन संचालनालयाचा सहभाग



**लातूर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी नगर प्रादेशिक पर्यटन कार्यालय आणि लातूर येथील आमच ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक २४/०७/२०२६ रोजी आषाढी एकादशी निमित् वृक्ष प्रसाद वाटप महोत्सव साजरा करण्यात आला. लातूर येथील दत्त मंदिर येथे दर्शनास आलेल्या भाविकांना प्रत्येकी २ वृक्षांचा प्रसाद म्हणून ६०० रोपांचे वाटप करण्यात आले .

आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन चे सर्व सदस्य व वृक्षप्रेमी नागरिक, पर्यटन संचालनालय छत्रपती संभाजी नगर चे सहाय्यक जिल्हा पर्यटन अधिकारी अजमुद्दीन शेख , प्रकल्प आई योजनेच्या प्रकल्प सहायक श्रीमती अबोली पवार, डॉ. मंजुषा कुलकर्णी, ऋषिकेश कुलकर्णी, डॉ. श्रीकृष्ण कुलकर्णी व डॉ. शिवाजी गायकवाड पर्यटन सहाय्यक छत्रपती संभाजी नगर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम घेण्यात आला.

पर्यटन विभाग आणि आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयटीआय परिसरातील महाविद्यालयातील परिसरामध्ये काही वृक्षांचे रोपण करण्यात आले.

आलेल्या सर्व भाविक भक्तांना वृक्षांचा प्रसाद म्हणून आमच ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन च्या वतीने वृक्ष वाटप करण्यात आले. यावेळी भाविक भक्तात मोठा उत्साह दिसून आला.

सोबतच प्लास्टिक पिशवी मुक्त लातूरचा संदेश देत मजबूत टिकाऊ पर्यावरण पूरक अशा २०० कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

आषाढी वारी ही पर्यावरण पूरक झाली पाहिजे आणि पर्यावरणाचा समतोल राखला जावा व नागरिकांमध्ये लातूर परिसरातील आपलं लातूर हे ग्रीन व्हायला हवं आणि या ठिकाणची पाण्याची समस्या कायम मिटायला हवी म्हणून जास्तीत जास्त वृक्ष लागवड करणे हे ध्येय घेऊन सदर फाउंडेशन ने हे कार्य हाती घेतलेल आहे .

या उपक्रमात महाराष्ट्र पर्यटन संचालनालय यांच्या वतीने विशेष सहाय्य म्हणून त्यांच्यासोबत संयुक्तरित्या जोडत आहे.

पर्यटन संचनालयाचे प्रादेशिक पर्यटन उपसंचालक श्री .विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर परिसरात विविध उपक्रम व महाराष्ट्र पर्यटन संचालनालया च्या योजना लातूर येथील लाभार्थ्यापर्यंत पोहोचविण्यात येणार आहे .असे प्रतिपादन पर्यटन सहायक डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले. या उपक्रमात लातूर येथील वृक्षप्रेमींनी सहभागी होऊन मोठा प्रतिसाद दिला.

# विविध कारणांनी आस्थापनांना ९४ हजार रुपयांचा दंड; मनपाची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** सार्वजनिक रस्त्यावर कचरा टाकणे,सिंगल युज कॅरीबॅगचा वापर, अनधिकृत बॅनर लावणे,अतिक्रमणे करणे यासह विविध कारणांसाठी लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने विविध आस्थापनांना ९४ हजार ६०० रुपयांचा दंड करण्यात आला.

लातूर शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी मनपा प्रयत्नशील आहे. परंतु अनेकदा व्यावसायिक व व्यापाऱ्यांकडून अस्वच्छता केली जाते. अशा व्यापारी, व्यावसायिक व आस्थापनांना सूचना देऊन त्यानंतरही फरक नं पडल्यास कारवाई करण्याचे आदेश मनपा आयुक्त राहुल कुलकर्णी, उपायुक्त वसुधा फड,मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे यांनी दिलेले होते.




त्यानुसार मनपाच्या स्वच्छता विभागाने छत्रपती शिवाजी महाराज चौक, अंबाजोगाई रोड, औसा रोड, गांधी चौक, गंजगोलाई, राजीव गांधी चौक, शाहू चौक, कव्हा नाका, अहिल्यादेवी होळकर चौक, आंबा हनुमान, विवेकानंद चौक या परिसरात दंडात्मक कार्यवाही केली. एकूण ९४ हजार ६०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

ए झोनमध्ये १३ हजार रुपये, बी झोन मध्ये २९ हजार रुपये, सी झोनमध्ये १५ हजार रुपये व डी झोन मध्ये ३७ हजार ६०० रुपये दंड वसूल करण्यात आला.

या कारवाईत मुख्य स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे,शिवराज शिंदे, अक्रम शेख, धोंडीराम सोनवणे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

# लातूरच्या प्रभाग २ मध्ये महिलांसाठी मोफत शिलाई मशिन प्रशिक्षण केंद्राचा ट्वेंटी वन अॅग्रो लि.संचालिका सौ. अदितीताई देशमुख यांच्या हस्ते शुभारंभ

### विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या उपक्रमाला महिला भागिनीचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी :** महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने लातूरच्या विलासराव देशमुख फाउंडेशनकडून विविध उपक्रम राबवले जातात.याचाच एक भाग म्हणून लातूर शहरातील वेगवेगळ्या भागात महिलांसाठी मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र सुरु केले जात आहेत.

लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ०२ मधील विठ्ठल रुक्मिणी मंदिर,हरिभाऊ नगर,यासह परिसरातील महिलासाठी मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र क्र. १७ चा शुभारंभ सोहळा ट्वेन्टी वन अॅग्रो लि.च्या संचालिका सौ.अदितीताई अमित देशमुख यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात संपन्न झाला.

विलासराव देशमुख फाउंडेशन लातूरच्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कौशल्य विकास उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सुरू करण्यात येणाऱ्या मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्रात महिलांना आधुनिक पद्धतीने शिलाईचे प्रशिक्षण देण्यात येणार असून,प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर स्वयंरोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी देखील मार्गदर्शनही करण्यात येणार आहे. या बोलताना ट्वेन्टी वन अग्रो लि.च्या संचालिका सौ. अदितीताई अमित देशमुख म्हणाल्या की, महिलांना कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभा करण्यासाठी या कौशल्याचा उपयोग करून त्यांच्यामध्ये आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी विलासराव देशमुख फाउंडेशन काम करत आहे हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत देण्यात येत आहे.

आज पर्यंत विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या माध्यमातून ७ हजारांपेक्षा अधिक महिला भगिनींना




रोजगारभीमुख प्रशिक्षण देण्यात आले आहे. या उपक्रमाअंतर्गत महिलाना शिलाई मशीन,ब्युटी पार्लर,इंग्लिश स्पोकन रिटेल सेल्स,केक तयार करणे असे विविध कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देण्यात आले.

याचा लातूर शहरातील व परिसरातील महिलांना उपयोग होत आहे. त्याचबरोबर विलासराव देशमुख फाउंडेशन कडून व्ही. डी. एफ बाजार ही संकल्पना राबविण्यात येत आहे याच्या माध्यमातून शहरातील व शहरालगतच्या परिसरातील महिलांना एक हक्काची बाजारपेठ तयार करण्याचे काम विलासराव देशमुख फाउंडेशनच्या माध्यमातून झाले आहे.

या कार्यक्रमासाठी लातूर शहर महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, विलासराव देशमुख फाउंडेशन स्किल डेव्हलपमेंट सेंटरच्या विभाग प्रमुख श्रीमती संगीता मोळवणे,मनपा सदस्य अँड.शेख फारूक,शहेनाज असिफ गोलंदाज,अंकिता भडिकर,शिलाताई वाघमारे,सोशल मीडिया प्रमुख प्रवीण सूर्यवंशी,मंदाकिनी पेठे,रोहिणी शिंदे,रसाळ मॅडम,ट्रेनर जिन्नत शेख,समनव्यक गजानन बोयणे, सोमनाथ कावळे यांच्यासह परिसरातील प्रशिक्षण घेणाऱ्या महिला भगिनी,महिला बचतगट सदस्य, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

दरम्यान या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल,गरजू तसेच ग्रामीण व शहरी भागातील महिलांना कौशल्य आत्मसात करून स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास प्रोत्साहन मिळणार असून महिलांना रोजगारक्षम बनविणे,त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करणे आणि आत्मनिर्भरतेकडे वाटचाल घडविणे हा या उपक्रमा मागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी यावेळी बोलताना सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सत्यवान कांबळे यांनी केले.

# जल जीवन मिशन कामाच्या चौकशीला विलंब; तक्रारीनंतरही प्रशासनाकडून हालचाल नाही

### चौकशी न झाल्यास उच्च न्यायालयात धाव घेणार; अॅड. सुनील बगाटे यांचा इशारा



**हिंगोली/विशेष प्रतिनिधी :** औंढा नागनाथ तालुक्यातील मौजे जडगाव येथे जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या सुमारे १.३४ कोटींच्या ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या कामात कथित अनियमितता झाल्याची तक्रार जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे दाखल करण्यात आली असून, तक्रार दाखल करूनही बराच कालावधी उलटून गेला असतानाही अद्याप कोणतीही प्रत्यक्ष चौकशी सुरू न झाल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, सार्वजनिक निधीतून राबविण्यात आलेल्या विकासकामांच्या पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

तक्रारीनुसार, जल जीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेल्या विविध कामांमध्ये गंभीर स्वरूपाच्या त्रुटी असून त्यांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करणे आवश्यक आहे. यामध्ये निकृष्ट दर्जाचे बांधकाम, शासकीय जमीन उपलब्ध असतानाही विहिरीसाठी खाजगी जमिनीचा वापर, गावापासून दूरस्थ ठिकाणी विहिरीचे बांधकाम तसेच योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान झालेल्या कथित प्रशासकीय व तांत्रिक अनियमितता यांसारख्या बाबींचा समावेश असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारदारांनी जिल्हा प्रशासनाकडे या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र तांत्रिक व प्रशासकीय चौकशी करण्याची मागणी केली असून, चौकशीत दोषी आढळणारे संबंधित अधिकारी, कंत्राटदार तसेच ग्रामपंचायतीशी संबंधित जबाबदार व्यक्तींवर शासकीय नियमांनुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. सार्वजनिक निधीचा वापर पारदर्शक पद्धतीने होणे अपेक्षित असताना अशा स्वरूपाच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही होणे आवश्यक असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, तक्रार दाखल होऊनही संबंधित विभागाकडून कोणतीही प्रत्यक्ष चौकशी सुरू झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. सार्वजनिक हिताशी निगडित महत्त्वाच्या योजनेबाबत आलेल्या तक्रारींवर प्रशासनाने त्वरित निर्णय घेणे अपेक्षित असताना होत असलेल्या विलंबामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असल्याची चर्चा गावात सुरू आहे.

या संदर्भात अॅड. सुनील बगाटे यांनी सांगितले की, जल जीवन मिशनसारख्या महत्त्वाच्या योजनेत सार्वजनिक निधीचा वापर झाला असल्यामुळे संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. प्रशासनाने तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ चौकशीचे आदेश द्यावेत, अशी त्यांची मागणी आहे. जर जिल्हा प्रशासनाने यापुढेही चौकशी सुरू केली नाही, तर न्याय मिळविण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

या प्रकरणात जिल्हा प्रशासनाकडून अद्याप अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नसून, संबंधित तक्रारीवर पुढे कोणती कार्यवाही केली जाते, याकडे जडगावसह संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' मध्ये शेतकरी कर्जमाफी संदर्भात सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची विशेष मुलाखत

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांच्या आशा-आकांक्षांना नवी उमेद देणाऱ्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' या महत्त्वपूर्ण निर्णयाविषयी सविस्तर माहिती देणारी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची विशेष मुलाखत माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास' या लोकप्रिय कार्यक्रमांमधून प्रसारित होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या सहकार्याने शासनाने शेतकरीहिताला सर्वोच्च प्राधान्य देत 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर केली आहे. शेतकऱ्यांच्या कर्जाचा भार कमी करून त्यांना नव्या उमेदीने शेती करण्यासाठी सक्षम करणे, आर्थिक स्थैर्य प्रदान करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देणे, हा या योजनेमागील मुख्य उद्देश आहे.

या विशेष मुलाखतीमध्ये सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी योजनेची उद्दिष्टे, पात्रता, लाभाचे स्वरूप, लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया, अंमलबजावणीची कार्यपद्धती तसेच शेतकऱ्यांना प्रत्यक्षात कसा लाभ मिळणार आहे, याची सोप्या आणि सविस्तर शब्दांत माहिती दिली आहे. योजनेबाबत असलेल्या विविध प्रश्नांची उत्तरेही या मुलाखतीतून मिळणार असून, प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत शासनाच्या या निर्णयाची माहिती प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

'दिलखुलास' कार्यक्रमातून ही मुलाखत दि. २७ व २८ जुलै २०२६ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून; तसेच 'न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल पवर प्रसारित होणार आहे.

'जय महाराष्ट्र' कार्यक्रमामध्ये ही विशेष मुलाखत मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे; तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमांवरही ही मुलाखत उपलब्ध होईल. या मुलाखतीचे निवेदन डॉ.मृण्मयी भजक यांनी केले आहे.

# भक्त आणि भगवंताचे अतूट नाते

**अभंगवाणी, विद्यावाचस्पती विद्यानंद**

**भक्ताविण देवा।**
**कैंचे रूप घडे सेवा।।**
**शोभविलें येरयेरां।**
**सोनें एके ठायीं हिरा।।**
**देवाविण भक्ता।**
**कोण देते निष्कामता।।**
**तुका म्हणे बाळ।**
**माता जैसें स्नेहजाळ।।**

महाराष्ट्राची संतपरंपरा ही केवळ भक्तीची परंपरा नसून ती मानवी जीवनातील प्रेम, समता, करुणा आणि आत्मज्ञान यांचा अखंड प्रवाह आहे. या परंपरेत संत तुकाराम महाराजांचे स्थान अत्यंत विलक्षण आहे. त्यांनी आपल्या अभंगवाणीतून ईश्वर आणि भक्त यांच्यातील नाते इतक्या सहज, सोप्या आणि हृदयस्पर्शी शब्दांत व्यक्त केले आहे की त्यांच्या प्रत्येक अभंगात एक संपूर्ण जीवन तत्त्वज्ञान सामावलेले आहे. त्यांच्या दृष्टीने भक्ती म्हणजे केवळ नामस्मरण, पूजा-अर्चा किंवा कर्मकांड नव्हे; तर भक्त आणि भगवंत यांच्यातील प्रेम, विश्वास, समर्पण आणि आत्मीयतेचे अद्वितीय नाते आहे. म्हणूनच त्यांच्या अभंगांमध्ये देव हा सिंहासनावर बसलेला सर्वशक्तिमान शासक म्हणून नव्हे; तर भक्ताच्या प्रेमाने बांधला गेलेला करुणामूर्ती, सखा, माता, पिता आणि जीवनसाथी म्हणून उभा राहतो. या अभंगांमध्ये संत तुकाराम महाराजांनी भक्त आणि भगवंत यांच्यातील नाते सोन्या आणि हिर्याच्या उपमेने स्पष्ट केले आहे. सोन्यामध्ये हिरा जडवला की दोघांचीही शोभा अनेकपटींनी वाढते. त्याचप्रमाणे भक्ताच्या प्रेमामुळे देव अधिक जवळचा वाटतो आणि देवाच्या कृपेने भक्ताचे जीवन अधिक तेजस्वी बनते. हा परस्परपूरकतेचा विचार केवळ अध्यात्मापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण सामाजिक जीवनालाही लागू होतो. कुटुंबात आई-वडील आणि मुले, समाजात गुरू आणि शिष्य, राष्ट्रात नागरिक आणि



व्यवस्था, निसर्गात वृक्ष आणि पृथ्वी; प्रत्येक नाते हे एकमेकांमुळेच सुंदर बनते. कोणताही घटक स्वतंत्रपणे पूर्ण नसतो. परस्पर प्रेम, आदर आणि सहकार्य यांमुळेच जीवनाला अर्थ प्राप्त होतो. संत तुकाराम महाराज या सार्वत्रिक सत्याला भक्तीच्या माध्यमातून अत्यंत सुंदर शब्दांत व्यक्त करतात.

निष्काम सेवा

या अभंगांतील आणखी एक महत्त्वाचा विचार म्हणजे निष्कामता होय. आजच्या युगात बहुतेक नाती अपेक्षांवर उभी आहेत. व्यवहारात, मैत्रीत, अगदी सेवाकार्यातही मोबदल्याची अपेक्षा नकळत निर्माण होते. परंतु संत तुकाराम महाराज सांगतात की ईश्वराशी असलेले नाते हे कोणत्याही अपेक्षेवर आधारलेले नसते. ते केवळ प्रेमावर आधारलेले असते. जेथे अपेक्षा संपते, तेथे भक्ती सुरू होते. हीच निष्कामतेची अवस्था मनाला शांती देते आणि जीवनाला पावित्र्य प्रदान करते. भगवद्गीतेतील निष्काम कर्मयोग आणि संत तुकाराम महाराजांचा हा विचार यांमध्ये विलक्षण साम्य दिसून येते.

संत तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीत भक्ती ही केवळ ईश्वरप्राप्तीचे साधन नाही; तर ती भक्त आणि भगवंत यांच्यातील अखंड, जिव्हाळ्याच्या आणि परस्परपूरक नात्याची अनुभूती आहे. त्यांच्या अभंगांमध्ये देव हा केवळ पूजेचा विषय नसून; तो भक्ताच्या प्रेमाने, श्रद्धेने आणि समर्पणाने पूर्णत्व प्राप्त करणारा आहे. म्हणूनच ते म्हणतात, भक्ताविण देवा। कैंचे रूप घडे सेवा।। या एका ओळीत त्यांनी भक्तीचे संपूर्ण तत्त्वज्ञान व्यक्त केले आहे. सामान्यतः माणूस असा विचार करतो की भक्ताला देवाची गरज असते; परंतु संत तुकाराम महाराज याउलट एक विलक्षण विचार मांडतात. ते सांगतात की भक्ताशिवाय देवाचेही रूप पूर्ण होत नाही. भक्त आणि भगवंत हे दोन वेगळे घटक नसून ते एकमेकांचे अस्तित्व अर्थपूर्ण करणारे आहेत.

# वेधशाळेपासून आंदोलनस्थळापर्यंत...

## जंतर-मंतरचा ३०० वर्षांचा प्रवास

दिल्लीतील जंतर-मंतर हे नाव घेताच अनेकांच्या डोळ्यांसमोर आंदोलन, उपोषणे आणि घोषणाबाजीचे चित्र उभे राहते. मात्र, जवळपास ३०० वर्षांपूर्वी उभारलेली ही वास्तू मुळात ग्रह-तारे, सूर्य आणि चंद्र यांच्या हालचालींचा अभ्यास करण्यासाठीची खगोलशास्त्रीय वेधशाळा होती. विज्ञानाचा वारसा जपणारे हे ऐतिहासिक स्मारक काळाच्या ओघात भारताच्या लोकशाहीतील सर्वात महत्त्वाच्या आंदोलनस्थळांपैकी एक बनले. सध्या कॉक्रोच जनता पार्टी आणि पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांच्या आंदोलनामुळे जंतर-मंतर पुन्हा चर्चेत आले आहे. खगोलशास्त्राच्या वेधशाळेपासून लोकशाहीच्या व्यासपीठापर्यंतचा जंतर-मंतरचा हा ऐतिहासिक प्रवास...



जंतर-मंतर म्हणजे नेमके काय?

'जंतर' म्हणजे यंत्र आणि 'मंतर' म्हणजे मोजमाप. म्हणजेच आकाशातील ग्रह-तारे, सूर्य, चंद्र यांच्या हालचालींचे निरीक्षण करण्यासाठी तयार करण्यात आलेली दगडी खगोलशास्त्रीय वेधशाळा. महाराजा सवाई जयसिंह दुसरे यांनी इ.स. १७२४ मध्ये ही वेधशाळा उभारली. येथे तार्यांची स्थिती, ग्रहांची गती, सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहण अचूकपणे मोजण्यासाठी अनेक विस्तीर्ण वास्तू आहेत. येथील विज्ञानाचे आणि खगोलशास्त्राचे हे अप्रतिम भारतीय तंत्रज्ञान आजही पर्यटकांना आणि इतिहासप्रेमींना अचूक माहिती देते.

तेथे कोणती यंत्रे आहेत?

दिल्लीतील जंतर-मंतरमध्ये एकूण १३ प्रमुख खगोलशास्त्रीय उपकरणे आहेत.त्यातील सम्राट यंत्र (विशाल सूर्यघड्याळ), जयप्रकाश यंत्र, राम यंत्र, मिश्र यंत्र, राशिवलय यंत्र ही प्रमुख यंत्रे आहेत. त्यांच्या साहाय्याने वेळ, ग्रहांची उंची, दिशा, सूर्याची स्थिती, विषुव, अयन यांचे निरीक्षण केले जात असे. दुर्बिणीचा वापर न करता इतकी अचूक निरीक्षणे करण्याची ही त्या काळातील अद्वितीय वैज्ञानिक रचना होती.

किती जागेवर पसरले आहे?

मूळ वेधशाळेचा परिसर पूर्वी खूप मोठा होता; परंतु दिल्लीत झपाट्याने झालेल्या शहरीकरणामुळे आणि विकासकामामुळे हा परिसर मूळ स्वरूपातून संकुचित झाला आहे. सध्या जंतर मंतरचा खगोलशास्त्रीय वास्तू असलेला मुख्य भाग आणि त्याला लागून असलेला खुला परिसर मिळून जवळपास १० ते १२ एकरांच्या आसपास आहे. यातील काही भाग भारतीय पुरातत्त्व विभागाच्या नियंत्रणाखाली आहे, तर उर्वरित परिसर हा प्रामुख्याने निदर्शने आणि आंदोलनांसाठी राखीव ठेवला गेला आहे.

१७२४ पूर्वी तिथे काय होते?

१७२४ पूर्वी हा भाग तत्कालीन शाहजहानाबादच्या बाहेरील खुल्या मैदानांचा भाग होता. सवाई जयसिंह यांनी खगोल निरीक्षणासाठी ही जागा निवडून येथे वेधशाळा उभारली. १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात या वेधशाळेचे काही प्रमाणात नुकसान झाले. पुढे ब्रिटिश काळात ती दुर्लक्षित राहिली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला तिचे जतन व दुरुस्ती करण्यात आली. आज ही वास्तू राष्ट्रीय संरक्षित वारसा स्थळ आहे.

आंदोलनांचे केंद्र कसे बनले?

स्वातंत्र्यानंतर अनेक दशके जंतर-मंतर हे मुख्यतः पर्यटनस्थळ होते; परंतु संसद भवन-ाजवळ, राजपथ (आताचा कर्तव्यपथ), मंत्रालये आणि राष्ट्रीय माध्यमांच्या कार्यालयांच्या जवळ असल्यामुळे आंदोलकांसाठी हे अत्यंत सोयीचे ठिकाण ठरले. १९८०-९० च्या दशकात विविध संघटनांनी येथे धरणे सुरू केली. पुढे दिल्ली प्रशासनाने जंतर-मंतर परिसराला आंदोलनासाठी निश्चित जागा म्हणून मान्यता दिली. त्यामुळे देशभरातील संघटना आपला आवाज केंद्र सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी येथे येऊ लागल्या.

आंदोलने कधीपासून आणि कशी सुरू झाली?

जंतर मंतरवर आंदोलने करण्याची परंपरा ही स्वातंत्र्योत्तर भारताच्या राजकीय प्रवासाशी जोडलेली आहे. पूर्वी दिल्लीत रामलीला मैदान किंवा संसद भवनासमोर निदर्शने केली जात असत; परंतु संसदेच्या परिसराजवळ असल्याने आणि सुरक्षेच्या कारणास्तव, हळूहळू जंतर मंतर हा आंदोलनांसाठीचा मुख्य अड्डा म्हणून निश्चित करण्यात आला.विशेषतः २०११ च्या अण्णा हजारे यांच्या लोकपाल आंदोलनानंतर जंतर मंतर हे भारतीय लोकशाहीतील जनआंदोलनांचे जागतिक पातळीवर ओळखले जाणारे प्रतीक बनले. शेतकरी आंदोलने, कामगार संघटनांचे मोर्चे, पर्यावरणवादी लढे, पेन्शनधारकांच्या मागण्या आणि विविध सामाजिक न्यायविषयक मोर्चे येथे नियमितपणे पार पडू लागले.

न्यायालयीन हस्तक्षेप

जंतर मंतर हा लोकशाहीचा हुंकार मांडणारा महत्त्वाचा परिसर असला, तरी गेल्या काही वर्षांत या परिसरातील वाढती गर्दी, निदर्शनांचे लोण आणि कर्णकर्कश आवाजाच्या त्रासामुळे हा भाग कायदेशीर वादात सापडला. परिसरातील रहिवाशांच्या तक्रारीनंतर काही काळ जंतर-मंतरवरील आंदोलनांवर निर्बंध होते. नंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार प्रशासनाने सार्वजनिक सुव्यवस्था आणि नागरिकांचे हक्क यांचा समतोल राखत नियंत्रित पद्धतीने आंदोलनांना परवानगी देण्याची व्यवस्था केली आहे.

# जोर काढू नका बद्धकोष्ठतेसाठी हे घरगुती उपाय वापरून तर पाहा

तुम्ही जर बद्धकोष्ठतेच्या समस्येने त्रस्त असाल तर या गोष्टी तुमच्यासाठी खूप उपयुक्त ठरतील. गॅसचा त्रास होणार नाही चला तर मग जाणून घेऊयात कोणत्या आहेत त्या गोष्टी. बद्धकोष्ठता ही आजच्या काळातील सर्वात सामान्य आरोग्य समस्या आहे. वारंवार बद्धकोष्ठता हे देखील एक लक्षण आहे की पचन प्रक्रिया निरोगी पद्धतीने काम करत नाही. बद्धकोष्ठतेचे प्रमुख कारण तुमच्या जेवणाच्या ताटात दडलेले असते.

अनेकांना या समस्येचा खूप त्रास होतो. सकाळी सकाळी होणाऱ्या या त्रासपासून सुटका मिळवण्यासाठी काही घरगुती उपाय करू शकता. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थच्या मते बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून मुक्त होण्यासाठी घरी अनेक प्रकारचे घरगुती उपाय उपलब्ध आहेत, ज्यामुळे बद्धकोष्ठतेच्या समस्येवर मात करता येते. हे उपाय करून बघून बद्धकोष्ठतेसोबतच पोटात गॅस, दुखणे इत्यादी अनेक समस्यांपासून आराम मिळू शकतो. पण त्या आधी बद्धकोष्ठता म्हणजे काय? बद्धकोष्ठता कसे होते हे जाणून घेऊयात (फोटो



बद्धकोष्ठतेची समस्या काय आहे

रुग्णाला बद्धकोष्ठतेचा त्रास होतो तेव्हा रुग्णाचा मल मोठ्या आतड्यात जाण्यापूर्वीच जड होतो आणि तो आतड्यांवर चिकटून राहतो, जो कठीण असल्याने बाहेर येऊ शकत नाही. यामध्ये मोठ्या आतड्याचे आकुंचन आणि सोडण्याचे कामही मंदावते.जेव्हा मोठ्या आतड्याच्या आधीच कडक झालेल्या अवस्थेत स्टूल थांबते, तेव्हा गॅसची समस्या देखील होते.काही रुग्णांना गॅसच्या समस्येमुळे हृदयदुखीचा त्रासही होतो. बद्धकोष्ठता का होते? बद्धकोष्ठतेच्या अनेक कारणांपैकी दैनंदिन जीवन आणि आहाराशी संबंधित कारणांमध्ये या गोष्टींचा समावेश होतो. तुमच्या आहारात फायबरचा अभाव. म्हणजेच तुम्ही कमी खातात किंवा फायबरयुक्त अन्न खाऊ नका. जे लोक हिरव्या भाज्या खात नाहीत त्यांना बद्धकोष्ठतेचा त्रास होतो. (**क्रमशः उद्याच्या अंकात**)

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

जेव्हा अफ्रोडाईट या प्रेमाच्या ग्रीक देवतेचा जन्म झाला, ती समुद्रातून वर आली होती. या देवतेच्या नावावरुनच ॲफ्रोडिजियाक हे नाव पडलं आहे. कामेच्छा जागृत करणाऱ्या अन्नाला अफ्रोडिजियाक म्हटलं जातं.कालवांना ॲफ्रोडिजियाक म्हटलं जातं. कालवांमध्ये मोठ्या प्रमाणात झिंक आढळतं. शरीरात टेस्टोस्टेरोनची निर्मिती करण्यासाठी झिंकचा उपयोग होतो. संशोधनानुसार, झिंकमुळे वीर्याची गुणवत्ता वाढून प्रजननक्षमतेतही वाढ होते.




## २ Joke विनोद




डॉक्टर : तू आता काही तासांचाच सोबती आहेच. तुझी शेवटची इच्छा सांग.

पेशंट : हो, मला दुसऱ्या डॉक्टरला दाखवायचे आहे.

## ३ Message संदेश



Dhamki
Kappil Office ja raha tha..
Patni Piyar se Boli:
"See U in the Evening."
.Kappil Ghusse se: Saali
Dhamki kise de rahi hai?
Me Bhi Tujhe Dekh lunga..

## ४ Thought सुविचार




खोट्याचे मर्म फसवणुकीत आहे, शब्दांत नाही.
- महात्मा गांधी

**संस्कृत सुभाषित**

**अज्ञश्चाश्रद्धानश्च संशयात्मा विनश्यति**
**नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मन :।।**
**(भीष्मपर्व, अध्याय २८, श्लोक ४० महाभारत)** अज्ञ असून श्रद्धा न ठेवणारा असा संशयखोर मनुष्य सर्वथा नाश पावतो, अशा संशयात्म्याला ना इहलोक, ना परलोक, ना सुख.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. मारुती
५. लाकडाची (वस्तू)
८. राग
११. जास्तीत जास्त व कमीत कमी
१३. रणांगण
१४. द्राक्षाचा, केळ्यांचा घोस
१५. पातळ खांब
१६. बातमीदार
१७. पुन्हा
१८. संगीतसम्राट
२१. रेती
२३. हिंदीत माळ
२४. प्रख्यात, प्रसिद्ध
२६. कीर्तनकार, ह.भ.प.चे विस्तृत रुप
२८. मांडणी
२९. राजाची पत्नी
३०. विधवेशी लग्न
३२. धुंदी
३३. सापाने टाकलेली त्वचा
३४. पवित्र
३६. कमळ
३७. झोपडी
३८. वर-वधुमधील पडदा
३९. घागरा
४१. धार्मिक गट
४२. आकाश
४४. पिता
४५. फळांचे पेय
४६. रद्द
४७. जन्म-मृत्यू
४९. आणि
५०. नशा आणणारा, कैफी
५२. लोणच्यातील द्रव मसाला
५४. गर्दभ
५५. गवंड्याकडील सिमेंट थापण्याचे साधन
५६. फुलांची माळ
५७. एकापेक्षा दुसरा वरचढ
५९. हुक्की, लहर
६०. चौथा हिस्सा
६१. खटला, हक्क सांगणे
६२. एकावर एक रचलेले
६४. नाव हाकणारा
६५. विमानाची धावपट्टी (इंग्रजी)
६६. जाळण्यायोग्य
६७. धमनी

### उभे शब्द

२. तोटा
३. आईचा भाऊ
४. -- दमयंती
५. तिबेटी धर्मगुरु
६. दयाळू
७. युद्ध
८. साथसोबत
९. तणाव
१०. अवघड, कष्टप्रद
१२. चावी
१३. पत्नी
१४. राहण्याची जागा
१५. पृथ्वीभोवतीचा हवेचा पट्टा
१७. पळून जाणे
१९. सेनापती
२०. वाकण्याची क्रिया
२१. वायू, वारा
२२. रक्त सांडणे
२३. भडीमार
२५. नमस्कार
२६. विश्वासघातकी
२७. गुणाकार
३१. सरसकट
३३. खर्चात कपात
३४. वार्ता, समाचार
३५. बाळभाषते पाणी
३६. प्रधानमंत्री
४०. तीव्र ऊन
४३. जाणकार
४३अ. नम्र, वाकलेला
४४. ढग (सं), भरभर
४५. अखेरीस
४७. लोकसंख्येची मोजणी
४८. यजमान
५०. मावशीचा मुलगा
५१. गोष्टी सांगणे
५२. संसद सदस्य
५३. रसपूर्ण
५८. उग्र वासाची एक पालेभाजी
६३. फळातील द्रव

### आडवे उत्तर

१.हनुमान ५.लाकडी ८.संताप ११.कमालकिमान १३.समरांगण १५.वासा १६.वार्ताहर १७.परत १८.तानसेन २१.वाळू २३.माला २४.नामवंत २६.हरिभक्तपरायण २८.रचना २९.राणी ३०.पाट ३२.नशा ३३.कात ३५.पाक ३६.पंकज ३७.खोपट ३८.अंतरपाट ३९.परकर ४१.संप्रदाय ४२.आसमान ४४.जनक ४५.सरबत ४६.रहित ४७.जननमरण ५०.मादक ५२.खार ५४.गाढव ५५.थापी ५६.गजरा ५७.शेरास सवाशेर ५९.सणक ६०.पाव ६१.दावा ६२.थर ६४.नाखवा ६५.रनवे ६६.जळाऊ ६७.नस

### उभे उत्तर

१.नुकसान ३.मामा ४.नल ५.लामा ६.कनवाळू ७.समर ८.संगत ९.ताण १०.खडतर १२.किल्ली १३.सहचारिणी १४.घर १५.वातावरण १७.पलायन १९.सेनानायक २०.नम २१.वात २२.रक्तपात २३.मारा २५.वंदन २६.हरमाखोर २७.पट ३१.सकटनिकट ३३.काटकसर ३४.बातमी ३५.पापा ३६.पंतप्रधान ४०.रणरण ४३.माहितगार ४३अ.नत ४४.जलद ४५.सरतेशेवटी ४७.जनगणना ४८.नवरा ५०.मावसभाऊ ५१.कथाकथन ५२.खासदार ५३.रसवान ५८.शेपू ६३.रस



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारताने एफआयएच युथ हॉकी फाईव्हस आशियाई चॅम्पियनशिप जिंकली

मस्कत–भारताच्या सब–ज्युनियर पुरुष संघाने पाकिस्तानला ३–१ ने पराभूत करत एफआयएच युथ हॉकी फाईव्हस आशियाई चॅम्पियनशिप जिंकली. अंतिम सामन्यात भारताने कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानला ३–१ ने हरवले. रोमित पाल (५ व्या मिनिटाला), कर्णधार केतन कुशवाहा (१२ व्या मिनिटाला) आणि शाहरुख अली (१३ व्या मिनिटाला) यांच्या गोलांनी भारताचे आशियाई विजेतेपद निश्चित केले. या विजयामुळे भारतीय पुरुष संघ एलिट पूलच्या गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला आहे.अचूक पासिंग आणि शिस्तबद्ध रणनीतीच्या जोरावर भारताने अंतिम सामन्यात सुरुवातीलाच आघाडी घेतली. पहिल्या हाफमध्ये रोमित पालने पाकिस्तानी गोलरक्षकाला चकवून पहिला गोल केला, ज्यामुळे मध्यंतरापर्यंत भारताला १–० अशी आघाडी मिळाली. दुसऱ्या हाफच्या सुरुवातीला कर्णधार केतन कुशवाहाने (१२ व्या मिनिटाला) आणखी एक गोल करून भारताला मजबूत स्थितीत आणले. त्यानंतर लगेचच शाहरुख अलीने आणखी एक गोल करून ३–० अशी आघाडी मिळवून दिली. मोहम्मद उस्मानने १६ व्या मिनिटाला केलेल्या गोलमुळे पाकिस्तानने पिछाडी कमी केली.

### वैभवला शतकाची हुलकावणी

दिल्ली–सलामीवीर वैभव सूर्यवंशीच्या ८१ धावांच्या खेळीमुळे भारताने तिसऱ्या टी२० सामन्यात झिम्बाब्वेसमोर १९३ धावांचे लक्ष्य ठेवले. हरारे येथे नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने २० षटकांत ८ गडी गमावून १९२ धावा केल्या. वैभवने आपल्या ४९ चेंडूंतील ८१ धावांच्या खेळीत ८ चौकार आणि ४ षटकार मारले. वैभवसोबत इशान किशनने २९ धावा आणि कर्णधार श्रेयस अय्यरने २७ धावा केल्या. तिलक वर्मा ११ धावांवर नाबाद राहिला. या मालिकेतील पहिल्या सामन्यातही वैभवने धमाकेदार अर्धशतक झळकावले होते. भारताची सुरुवात खराब झाली
अभिषेक शर्मा २ धावांवर बाद झाल्याने भारताची सुरुवात खराब झाली. त्यानंतर वैभव आणि इशानने दुसऱ्या विकेटसाठी ७५ धावा जोडून डाव सावरला. ईशान बाद झाल्यानंतर, वैभवने कर्णधार श्रेयस अय्यरसोबत ५० धावा जोडून ३१ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. झिम्बाब्वेकडून ब्रॅड इव्हान्सने दोन बळी घेतले, तर ब्लेसिंग मुझारबानी, सिकंदर रझा आणि वेस्ली माधेवेरे यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. हरारे स्पोर्ट्स क्लब येथे भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील तिसऱ्या टी२० सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय संघात दोन मोठे बदल करण्यात आले.

### बीसीसीआयच्या आढावा बैठकीत कोचचा पत्ता कट

मुंबई–भारताचा क्रिकेट संघ हा मागील काही दिवसांपासून परदेश दौऱ्यावर आहे, आधी आयर्लंड आणि नंतर इंग्लंडविरुद्ध सलग तीन मालिकांमध्ये टीम इंडियाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. आता भारताच्या संघाने तीन मालिका गमावल्यानंतर झिम्बाब्वेविरुद्ध मालिका जिंकली आहे, पण झालेल्या पराभवांची बीसीसीआय बैठक घेणार असे सांगण्यात आले होते. या मानहानीकारक पराभवानंतर, बीसीसीआयने आढावा बैठक घेण्याचा निर्णय घेतला. आता या बैठकीबाबत एक मोठे अपडेट समोर आले आहे. अनेक खेळाडूंची निराशाजनक कामगिरी राहिली आहे भारतीय संघाचा कर्णधार बदलला आणि त्यानंतर निकालावर मोठा परिणाम पाहायला मिळाला आहे.
आयर्लंडविरुद्धच्या दोन सामन्यांच्या टी२० मालिकेत भारताला ०–२ असा पराभव पत्करावा लागला. इंग्लंडमध्येही पराभवाची मालिका सुरूच राहिली. मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द झाला असला तरी, इंग्लंडने भारताचा ४–० असा पराभव केला. यानंतर, भारतीय संघ तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत २–१ ने पराभूत झाला. या पराभवानंतर, बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी आढावा बैठकीचे आयोजन केले होते.

### ब्रॅड इव्हान्सचा अफलातून कॅच

दिल्ली–१५व्या वर्षी आंतरराष्ट्रीय पदार्पण करणारा झिम्बाब्वेविरुद्धच्या तिसऱ्या टी२० सामन्यात वैभव सूर्यवंशी चौकार, षटकारांची लयलूट करत शतकाकडे वाटचाल करत होता. मात्र वेस्ली माढिवरेच्या बॉलिंगवर ब्रॅड इव्हान्सने अफलातून कॅच घेत त्याची खेळी संपुष्टात आणली. हरारेत सुरू असलेल्या झिम्बाब्वेविरुद्धच्या तिसऱ्या टी२० सामन्यात वैभवने ४९ चेंडूत ८ चौकार आणि ४ षटकारासह ८१ धावांची खेळी केली. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सगळ्यात लहान वयाचा शतकवीर होण्याची संधी वैभवकडे होती. मात्र इव्हान्सच्या भन्नाट कॅचने वैभवला तंबूत परतावं लागलं. माढिवरेने फसवा चेंडू टाकला. वैभवने डाऊन द ट्रॅक येत फटका खेळला. लॉन्गऑफला फिल्डिंग करणाऱ्या ब्रॅड इव्हान्सला खूप पुढे यावं लागलं. त्याने वेगात हे अंतर पार करून माशासारखा सूर लगावला. चेंडू जमिनीलगत होण्याआधी इव्हान्सने कॅच पूर्ण केला. कठीण कॅचेस कसे पकडावे याचा वस्तुपाठच इव्हान्सने सादर केला. इव्हान्सने कॅच पूर्ण करताच वैभवच्या चेहऱ्यावर निराशा पसरली. यंदाच्या आयपीएल स्पर्धेत धावांची टांकसाळ उघडत तुफान फटकेबाजी करणाऱ्या वैभवने

# लाकडाच्या मोळ्या उचलनारी, भारताची बनली वेटलिफ्टर गोल्डन गर्ल मीराबाई चानू

मुंबई : राष्ट्रकुल खेळांमध्ये सलग तीन सुवर्णपदके जिंकणाऱ्या भारोत्तोलक (वेटलिफ्टर) साइखोम मीराबाई चानूचे नाव आज जगभरात खूप अभिमानाने घेतले जाते. तिच्या गळ्यात चमकणारे सुवर्णपदक पाहून प्रत्येक भारतीयाची मान अभिमानाने उंच होते. मात्र, या मोठ्या यशामागे असणारा मीराबाईने केलेला संघर्ष खूपच कमी लोकांना माहीत आहे. मणिपूरमधील एका छोट्याशा गावातून सुरू झालेला तिचा प्रवास आज आंतरराष्ट्रीय स्तरावरील मोठ्या पदकांपर्यंत पोहोचला आहे.

लहानपणीच दिसली होती ताकद

मीराबाई चानूचा जन्म ८ ऑगस्ट १९९४ रोजी मणिपूरमधील इंफाळजवळ असलेल्या नोंगपोक काकचिंग या गावात झाला. लहानपणापासूनच तिच्यामध्ये जबरदस्त ताकद होती. घरासाठी लाकडाच्या जड मोळ्या उचलताना तिला अजिबात त्रास होत नसे. तिच्या याच ताकदीने पुढे तिच्या आयुष्याला एक नवी दिशा दिली. २००८ मध्ये मीराबाईने मणिपूर क्रीडा अकादमीमध्ये प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. पण तिची घरची परिस्थिती खूपच बेताची असल्यामुळे अकादमीपर्यंत जाणे–येणे तिच्यासाठी सोपे नव्हते.
ट्रकचालकांकडून लिफ्ट घेऊन प्रशिक्षणाला जायची घरून प्रशिक्षण केंद्र खूप लांब होते. बसचे भाडे परवडत नसल्यामुळे मीराबाई अनेकदा वाळू आणि दगड वाहून नेणाऱ्या ट्रकचालकांकडून लिफ्ट घ्यायची. त्या दिवसांत तिने सोसलेले हे कष्टच तिच्या पुढील मोठ्या यशाचा पाया ठरले.




**मीराबाई चानूची गोष्ट : राष्ट्रकुल खेळांमध्ये पुन्हा एकदा सुवर्णपदक जिंकणाऱ्या मीराबाई चानूचा हा प्रवास अजिबात सोपा नव्हता. घरासाठी लाकडाची जड मोळी उचलण्यापासून ते प्रशिक्षणासाठी ट्रकने प्रवास करण्यापर्यंतचा तिचा संघर्ष प्रेरणादायी आहे.**

टोकियो ऑलिम्पिकमध्ये ऐतिहासिक रौप्यपदक जिंकल्यानंतर मीराबाई आपले जुने दिवस आणि त्या ट्रक चालकांना अजिबात विसरली नाही. तिने त्या सर्व ट्रकचालकांना घरी बोलावून, त्यांचे पाय धरून त्यांचा खास सन्मान केला. तिच्या या कृतीने तिची कृतज्ञता आणि साधेपणा पुन्हा एकदा जगासमोर आला. राष्ट्रीय स्तरावरून थेट ऑलिम्पिकपर्यंत २०११ मध्ये मीराबाईने पहिल्यांदा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत भाग घेतला. त्यानंतर ती बंगळुरूमधील राष्ट्रीय शिबिराचा भाग बनली. २०१२ सालापासून तिने पटियाला येथे राष्ट्रीय क्रीडा संस्थेत व्यावसायिक प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. तिच्या याच सातत्यपूर्ण मेहनतीमुळे भारताच्या भारोत्तोलनामध्ये तिने स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली. देशासाठी केलेल्या या महान कामगिरीची दखल घेऊन मणिपूर सरकारने तिला पोलिस दलात अतिरिक्त पोलीस अधीक्षक हे पद दिले आहे.

सरकारच्या मदतीमुळे मिळाले जागतिक दर्जाचे प्रशिक्षण

मीराबाई चानूच्या यशात तिच्या स्वतःच्या मेहनतीसोबतच केंद्र सरकारच्या योजनांचाही खूप मोठा वाटा आहे. क्रीडा मंत्रालयाच्या 'लक्ष्य ऑलिम्पिक मंच योजना' आणि क्रीडा महासंघ अनुदान योजनेंतर्गत तिला मोठी आर्थिक मदत मिळाली.
राष्ट्रकुल खेळ २०२२ नंतर या योजनांतर्गत तिला सुमारे १.६६ कोटी रुपये, तर इतर मदतींतर्गत १४ लाख रुपयांहून अधिक मदत मिळाली. या मदतीमुळेच तिला अमेरिकेत जाऊन प्रसिद्ध डॉ. ॲरॉन हॉर्शिग यांच्याकडून विशेष प्रशिक्षण घेता आले. तसेच बर्मिंगहॅम आणि पॅरिस ऑलिम्पिकच्या आधी तिथल्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी तिला आधुनिक उपकरणांसह खास प्रशिक्षण शिबिराची सुविधा मिळाली.
त्यामुळे आज मीराबाईच्या गळ्यात झळकणारे सुवर्णपदक हे एका दिवसाच्या मेहनतीचे फळ नाही, तर त्यामागे तिने वर्षानुवर्षे केलेला त्याग, खडतर मेहनत आणि जिद्द दडलेली आहे.

# अय्यरचा कर्णधार म्हणून पहिला मालिका विजय!

नवी दिल्ली: भारत आणि झिम्बाब्वे यांच्याचील तिसरा टी–२० सामना जिंकून भारतीय संघाने टी–२० मालिका ३–०ने आपल्या नावावर केली आहे.
भारत आणि झिम्बाब्वे या दोन्ही संघांमध्ये पार पडलेल्या टी–२० मालिकेत श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली खेळत असलेल्या भारतीय संघान झिम्बाब्वेचा ३–० ने सुपडा साफ केला आहे. मालिकेतील तिसरा सामना हरारेतील हरारे स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर पार पडला. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय संघाने १९२ धावांचा डोंगर उभारला होता. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या झिम्बाब्वेने पूर्ण जोर लावला. पण झिम्बाब्वेचा संघ विजयापासून ३५ धावा दूर राहिला. यासह भारतीय संघाने ही मालिका ३–० ने आपल्या नावावर केली. हा श्रेयस अय्यरचा कर्णधार म्हणून पहिलाच मालिका विजय आहे.
सूर्युकमार यादवला कर्णधारपदावरुन काढल्यानंतर ही जबाबदारी श्रेयस अय्यरकडे सोपवण्यात आली होती. पण,

**भारताने झिम्बाब्वेचा ३–० ने केला 'सुपडा साफ'**

श्रेयस अय्यर कर्णधार म्हणून स्वत:ला सिद्ध करू शकला नव्हता . आयर्लंडविरुद्ध झालेल्या टी–२० मालिकेत भारतीय संघाला २–० ने लाजिरवाण्या पराभवाचा सामना करावा लागला. त्यानंतर झालेल्या इंग्लंडविरुद्धच्या टी–२० मालिकेत भारताला ४–० ने पराभव पत्करावा लागला. यासह लागोपाठ २ टी–२० मालिका गमावणारा तो पहिलाच भारतीय कर्णधार ठरला. पण अखेर झिम्बाब्वेत त्याने कर्णधार म्हणून पहिली मालिका जिंकली आहे.
या सामन्यात भारतीय कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पण भारतीय संघाला हवी तशी सुरुवात करता आली नाही. अभिषेक शर्मा अवघ्या २ धावा करुन माघारी परतला. त्यानंतर इशान किशन आणि वैभव सूर्यवंशीने मिळून भारतीय संघाचा डाव सावरला. इशान किशनने २९ धावांचे योगदान दिले. तर श्रेयस अय्यरने २७ धावांचे योगदान दिले. वैभव सूर्यवंशीकडे शतक झळकावण्याची सुवर्णसंधी होती. पण तो ८१ धावा करुन माघारी परतला. शेवटी रिंकू सिंगने २५ धावांची खेळी करून भारतीय संघाची धावसंख्या ५ गडी बाद १९२ धावांवर पोहोचवली.
झिम्बाब्वेला हा सामना जिंकण्यासाठी १९३ धावांचा डोंगर सर करायचा होता. या धावांचा पाठलाग करताना बेन करनने २० धावांची खेळी केली. तर डिओने मेयर्सने १९, मधेवेरेने २८ धावांचे योगदान दिले. झिम्बाब्वेकडून रायन बर्लने शेवटपर्यंत झुंज दिली. त्याने दमदार अर्धशतक झळकावलं. भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना मयांक यादवने ३, यश ठाकूरने २ आणि अशोक शर्मा, रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी १–१ गडी बाद केला.




### भारताला मिळाले दुसरें पदक, वेटलिफ्टिंगमध्ये ऋषिकांत सिंहची 'चांदी'; ९ किलोने हुकले गोल्ड

ग्लासगो–राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मधून भारतासाठी आणखी एक मोठी आणि आनंदाची बातमी आली आहे. भारताचा २८ वर्षीय वेटलिफ्टर चनंबम ऋषिकांत सिंह यानं पुरुषांच्या ६० किलो वजनी गटात शानदार कामगिरी करत रौप्यपदक जिंकलं आहे. या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील भारताचं हे एकूण दुसरं पदक आहे. यापूर्वी, पॅरा–पॉवरलिफ्टर झंडू कुमारनं भारतासाठी पहिलं कांस्यपदक जिंकलं होतं. स्नॅच फेरीत विक्रम प्रस्थापित करुन घेतली आघाडी : ऋषिकांतनं सामन्याच्या सुरुवातीलाच जबरदस्त फॉर्म दाखवला. त्यानं आपले तिन्ही स्नॅच प्रयत्न (११६ किलो, ११९ किलो आणि १२१ किलो) यशस्वीरित्या पूर्ण केले. आपल्या तिसऱ्या प्रयत्नात त्यानं १२१ किलो वजन उचलून केवळ वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीच केली नाही, तर राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील स्नॅचचा नवीन विक्रमही प्रस्थापित केला. स्नॅच फेरीच्या अखेरीस, तो मलेशियाच्या बिन कासदान मोहम्मद अनिकसोबत पहिल्या स्थानावर बरोबरीत होता.क्लीन अँड जर्कचा थरार अन् रौप्यपदक : क्लीन अँड जर्कच्या फेरीत, ऋषिकांतनं आपल्या पहिल्याच प्रयत्नात १४३ किलो वजन सहज उचललं. मात्र, दुसऱ्या प्रयत्नात तो १४८ किलो वजन उचलण्यात अयशस्वी ठरला.

# शतक हुकलं, पण वैभव सूर्यवंशीने इतिहास घडवला!

## वयाच्या १५ व्या वर्षी ही कामगिरी करणारा ठरला पहिलाच फलंदाज



नवी दिल्ली: भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील तिसऱ्या टी–२० सामन्यात वैभव सूर्यवंशीने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.
: भारत आणि झिम्बाब्वे या दोन्ही संघांमध्ये सुरु असलेल्या ३ टी–२० सामन्यांच्या मालिकेतील तिसरा सामना हरारे स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर सुरु आहे. या सामन्यात भारतीय संघाकडून पहिल्या डावात फलंदाजी करताना १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीची बॅट चांगलीच तळपळी. वैभवने या डावात वादळी ८१ धावांची खेळी केली. यादरम्यान त्याला आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिलं शतक झळकावण्याची संधी होती. त्याचं शतक जरी हुकलं असलं, तरीदेखील अर्धशतकी खेळी करुन त्याने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.
या मालिकेत संजू सॅमसनला विश्रांती देण्यात आली आहे. त्यामुळे वैभव सूर्यवंशीला तिन्ही सामन्यांमध्ये अभिषेक शर्मासोबत डावाची संधी मिळाली. या मालिकेतील पहिल्याच सामन्यात अर्धशतक झळकावून त्याने सचिन तेंडुलकरचा

**१५ वर्षीय वैभव सूर्यवंशीची बॅट चांगलीच तळपळी. वैभवने या डावात वादळी ८१ धावांची खेळी**

सर्वात कमी वयात अर्धशतक झळकावण्याचा रेकॉर्ड मोडून काढला होता. वैभवचं वयाच्या १५ व्या वर्षी झळकावलेलं हे पहिलंच शतक होतं. त्यानंतर दुसऱ्या सामन्यात फलंदाजी करताना त्याला चांगली सुरुवात मिळाली होती. पण तो २० धावा करुन माघारी परतला. आता तिसऱ्या सामन्यात त्याची बॅट पुन्हा एकदा तळपली आहे. वैभवने ३१ चेंडूंचा सामना करुन आपल्या टी–२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील दुसरं अर्धशतक झळकावलं. यासह तो वयाच्या १५ व्या वर्षी २ अर्धशतक झळकावणारा जगातील पहिलाच फलंदाज ठरला आहे.
भारताला दुसरं पदक! ऋषिकांत सिंगने ६० किलो वजनीगटात जिंकलं रौप्य; कॉमनवेल्थ गेम्समध्ये घडवला इतिहास
वयाच्या १५ वर्षी अर्धशतक झळकावण्याची कामगिरी नेपाळच्या कुशल मल्लाने देखील केली आहे. पण वैभव हा वयाच्या १५ व्या वर्षी २ अर्धशतकं झळकावणारा जगातील पहिलाच आणि एकमेव फलंदाज ठरला आहे. हा रेकॉर्ड मोडणं कठीण नव्हे, तर जवळजवळ अशक्य आहे. वैभवकडे शतक झळकावण्याची संधी होती. पण तो ८१ धावांवर बाद होऊन माघारी परतला. या खेळीदरम्यान त्याने ८ चौकार आणि ४ षटकार खेचले. पण मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात तो झेलबाद होऊन माघारी परतला.
भारतीय संघाने उभारला १९२ धावांचा डोंगर
या सामन्यातही भारतीय संघाला हवी तशी सुरुवात मिळाली नाही. अभिषेक शर्मा अवघ्या २ धावा करुन माघारी परतला. त्यानंतर वैभव सूर्यवंशी आणि इशान किशनने मिळून भारताचा डाव सावरला. इशानने २९ धावांची खेळी केली. तर कर्णधार श्रेयस अय्यरने २७ धावांचे योगदान दिले. वैभव सूर्यवंशीने सर्वाधिक ८१ धावांची खेळी केली. तर तिलक वम र्नि ११ आणि रिंकू सिंगने २५ धावा करुन भारतीय संघाची धावसंख्या १९२ धावांवर पोहोचवली.

## सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाचे उत्साहात उद्घाटन




**बाभळगाव /प्रतिनिधी:** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी शिवनेरी महाविद्यालय, शिरूर येथील प्रा. डॉ. धोंडीम धुमाळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते.

प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. धोंडीराम धुमाळे यांनी आपल्या मार्गदर्शनात सामाजिक शास्त्रांचे आधुनिक काळातील महत्त्व विशद केले. इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र व भूगोल या विषयांच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक दृ्विशीलहरज्ञींरसारळश्र.लो ष्टी, संशोधन वृत्ती, संविधानिक मूल्यांची जाणीव आणि सामाजिक उत्तरदायित्व विकसित होते, असे त्यांनी सांगितले. नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक शास्त्रांचा बहुआयामी अभ्यास आवश्यक असून विद्यार्थ्यांनी समाजातील विविध प्रश्नांचा अभ्यास करून परिवर्तनवादी दृष्टिकोन स्वीकारावा, असेही त्यांनी प्रतिपादन केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी प्रमुख पाहुण्यांनी मांडलेल्या विचारांचा सारांश देत सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळ हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावी व्यासपीठ ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. संविधानिक मूल्ये, सामाजिक बांधिलकी, संशोधनाची आवड आणि समाजाभिमुख विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी अभ्यास मंडळाच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतील, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच समाजातील घडामोडींचा चिकित्सक अभ्यास करून जबाबदार नागरिक म्हणून घडावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ.महावीर कटके, डॉ. दशरथ भिसे, डॉ.अंगद कोते, डॉ. जयदेवी पवार, डॉ. मीनाक्षी कोंगे, प्रा. शीतल खोत, अध्यक्ष कांबळे कविता, उपाध्यक्ष मुळे सुवर्णा, सचिव साखरे गणेश, सहसचिव जाधव सुमित, प्रसिद्ध प्रमुख कांबळे आदित्य यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सामाजिक शास्त्र विभाग प्रमुख प्रा. चंद्रकांत मोरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. नाना जाधव यांनी केले, तर आभार डॉ. इंद्रजित शिंदे यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माऊली शैक्षणिक संकुलाची आषाढी एकादशी निमित्त दिंडी उत्साहात संपन्न




**लातूर/प्रतिनिधी:** अंबाजोगाई रोडवरील उपक्रमशील शैक्षणिक केंद्र म्हणून परिचित असलेल्या माऊली विद्यार्थी विकास केंद्र, माऊली बालक मंदिर (सेमी इंग्लिश ) माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आज दि.२५/०७/२६ वार शनिवार रोजी आषाढी दिंडी काढली. पंढरपूरचा विठोबा म्हणजे महाराष्ट्राचे आराध्य दैवत होय. त्या परंपरेची, संस्काराची जाणीव व महत्व बालवयापासून होण्यासाठी दरवर्षी विद्यालयात आषाढी दिंडीचे आयोजन करण्यात येते. वारकऱ्यांच्या वेशभूषेत चिमुकले विद्यार्थी पालकांसमवेत सहभागी झाले होते. इरकल अंश याने विठ्ठलाची, शिंदे मनस्वी हिने रुक्मिणीची, गुलाले गौरव याने तुकारामाची, तर दंडिमे आरूष याने ज्ञानेश्वराची वेशभूषा साकारली होती.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना: लातूर जिल्ह्यातील ५४,४२६ पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर

### शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅकवर नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण करण्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना – २०२६ अंतर्गत लातूर जिल्ह्यातील ५४ हजार ४२६ पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांच्या याद्याही लवकरच प्रसिद्ध केल्या जातील, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली. सर्व पात्र शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी 'ग्रीस्टॅक'वर नोंदणी करून 'आधार प्रमाणीकरण' प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले आहे.

पहिल्या टप्प्यात २२ जुलै रोजी जाहीर झालेल्या यादीत लातूर जिल्ह्यातील २ गावांमधील १३३ पात्र शेतकऱ्यांचा समावेश होता. त्यानंतर आज लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यांतील ८९२ गावांमधील ५४ हजार २९३ पात्र शेतकऱ्यांची यादी शेतकरी सभासदांच्या विशिष्ट क्रमांकासहित जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ३५ हजार २३१, तर राष्ट्रीयकृत व खासगी बँकांचे १९ हजार १९५ अशा एकूण ५४ हजार ४२६ पात्र कर्जदार शेतकऱ्यांचा समावेश आहे.



आधार प्रमाणीकरणासाठी पात्र शेतकऱ्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे सूचना पाठवल्या जाणार आहेत. याशिवाय ग्रामपंचायत कार्यालये, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था आणि संबंधित बँकांच्या शाखांमध्येही लाभार्थ्यांच्या याद्या प्रसिद्ध केल्या जातील. योजनेतील प्रत्येक पात्र लाभार्थ्याला एक विशिष्ट ओळख क्रमांक देण्यात आला आहे. आधार क्रमांक किंवा या विशिष्ट क्रमांकाच्या आधारे आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक असून, जिल्ह्यातील सुमारे ८८८ आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यादीत नाव असलेल्या सर्व पात्र शेतकरी बांधवांनी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन आधार कार्ड, कर्ज खाते व बचत खात्याचे पासबुक, यादीत नावापुढे नमूद असलेला विशिष्ट क्रमांक आणि 'ग्रीस्टॅक' नोंदणी या आवश्यक कागदपत्रांसह आपली आधार प्रमाणीकरण प्रक्रिया तात्काळ पूर्ण करून घ्यावी. ग्रीस्टॅकवरील नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांच्या कर्ज खात्यात 'डीबीटी' प्रणालीद्वारे कर्जमुक्तीची रक्कम जमा केली जाईल, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली.

# प्रत्येकांनी जीवन वाचवणारे कौशल्य अवगत करणे ही आज काळाची गरज

## लातूरच्या एमआयटीत सीपीआर कौशल्य प्रशिक्षणास मोठा प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी:** हृदयविकाराच्या आपत्कालीन परिस्थीतीत जीव वाचविण्याबाबत करावयाच्या कृतीची जनजागृती करण्यासाठी भारतीय बालरोग संघटना (इंडियन ॲकॅडमी ऑफ पेडियाट्रीक्स) च्या वतीने जीवन वाचवणारे कौशल्य प्रशिक्षण लातूर येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयात कार्यक्रम घेण्यात आला. सीपीआर तंत्राचे महत्व पटवून हे तंत्रज्ञान केवळ वैद्यकीय कौशल्य नाही तर प्रत्येकाने शिकावे असे जीवन वाचवणारे कौशल्य आहे असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या कौशल्य प्रशिक्षणास मोठा प्रतिसाद मिळाला.




देशभर वैद्यकीय क्षेत्रातील जीवन वाचवणारे कौशल्य प्रशिक्षण व जनजागृतीसाठी प्रेरणादायी कार्य करणारे स्व. डॉ. आनंद शाडिल्य यांच्या स्मृती प्रित्यर्थ २१ जुलै रोजी संपूर्ण देशभर एकाच दिवशी जीवन वाचविण्याचे कौशल्य प्रशिक्षण देण्यात येते. या अनुषंगाने लातूरच्या भारतीय बालरोगतज्ञ संघटना यांच्या पुढाकारातून लातूर येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयात बालरोगतज्ञ संघटनेच्या अध्यक्षा डॉ. व्ही. डी. केंद्रे (कांदे) यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण समन्वयक डॉ. दिपीका माशाळकर यांच्या नेतृत्वात डॉ. शितल भट्टड, डॉ. विशाखा पडिले, डॉ. नैना गोडबोले यांनी प्रशिक्षणार्थींना मौलिक मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणात पन्नासहून अधिक प्रशिक्षित डॉक्टर्स सहभागी झाले होते.

हृदय विकाराचा झटका आल्यास किंवा श्वासोश्वास बंद पडल्यास आपत्कालीन परिस्थीतीत प्रत्येक सेकंद महत्वाचा असतो, वैद्यकीय मदत पोहचेपर्यंत जीवन वाचवणारे कौशल्य वेळेवर देण्यात आले तर रुग्णांच्या जिवीताची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढू शकते. छातीवर दाब द्या या मुलभूत जीवनरक्षक पद्धतीवर विशेषभर देण्यात आला. सीपीआर देण्याचे महत्व तसेच योग्य पद्धतीने छातीवर दाब, कृत्रीम श्वसनाची प्रक्रिया आणि आपत्कालीन परिस्थीतीत प्रतिसाद कसा द्यावा याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

लातूर एमआयटीचे परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार, उपअधिष्ठाता डॉ. बी. एन. नागोबा, रुग्णालय अधिक्षक डॉ. भागवत जाधव, डॉ. चंद्रकला पाटील यांच्या सहकार्यामूळे आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ. गायत्री, डॉ. प्रथमेश, डॉ. विवेक यांनी महत्वपूर्ण भुमिका बजावली. जीवन वाचवणारे कौशल्य शिका, त्वरीत कृती करा आणि जीव वाचवा हा संदेश देत जागरुकता निर्माण करण्याचा प्रयत्न प्रशिक्षण कार्यक्रमात करण्यात आला.

# राष्ट्रीय स्तरावर व्हीडीएफ स्कूल ऑफ फार्मसीला मानाचा बहुमान

## भारतीय गुणवत्ता परिषद NABET कडून ग्रेड अ मानांकन

**लातूर/प्रतिनिधी:** लातूरच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी उल्लेखनीय कामगिरी करीत व्हीडीएफ स्कूल ऑफ फार्मसी, लातूर या संस्थेने राष्ट्रीय स्तरावर गुणवत्ता आणि शैक्षणिक उत्कृष्टतेचा नवा मानदंड प्रस्थापित केला आहे.

संस्थेला भारतीय गुणवत्ता परिषद यांच्या राष्ट्रीय मूल्यांकन प्रक्रियेत देशात ३१ वा क्रमांक प्राप्त झाला असून QCIANABET म्हणजेच भारतीय गुणवत्ता परिषद अंतर्गत कार्यरत नॅशनल ॲक्रेडिटेशन बोर्ड फॉर एज्युकेशन अँड ट्रेनिंग यांच्याकडून प्रतिष्ठेचे अ वर्ग मानांकन बहाल करण्यात आले आहे.विशेष




म्हणजे हे मानांकन प्राप्त करणारी लातूरची व्हीडीएफ स्कूल ऑफ फार्मसी मराठवाडा विभागातील ही पहिली फार्मसी संस्था ठरली आहे.

संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धती,आधुनिक पायाभूत सुविधा,प्रभावी प्रशासन,संशोधन व नवोपक्रमाला चालना देणारे वातावरण,उद्योगाभिमुख अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत हे मानांकन प्रदान करण्यात आले आहे.त्यामुळे व्हीडीएफ स्कूल ऑफ फार्मसीने देशातील गुणवत्तापूर्ण फार्मसी शिक्षण देणाऱ्या अग्रगण्य संस्थांमध्ये आपले स्थान अधिक मजबूत केले आहे.

या यशामागे संस्थेच्या दूरदृष्टी असलेल्या व्यवस्थापनाचे सक्षम नेतृत्व,प्राचार्यांचे प्रभावी मार्गदर्शन,प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची निष्ठा, विद्यार्थ्यांची मेहनत,माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य तसेच सर्व हितचिंतकाचे सातत्यपूर्ण योगदान असल्याची भावना संस्थेच्या व्यवस्थापनाने व्यक्त केली.

यावेळी संस्थेच्या व्यवस्थापनाने या यशाचे संपूर्ण श्रेय विलासराव देशमुख फाउंडेशन परिवाराला देत सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. भविष्यातही गुणवत्ता,संशोधन,नवोपक्रम, उद्योग- संलग्न शिक्षण आणि समाजाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर संस्थेचे नाव अधिक उज्ज्वल करण्याचा निर्धार व्हिडीएफ कडून व्यक्त करण्यात आला आहे. व्हीडीएफ स्कूल ऑफ फार्मसीच्या या ऐतिहासिक यशामुळे लातूरसह संपूर्ण मराठवाड्याच्या शैक्षणिक क्षेत्राचा नावलौकिक उंचावला असून विविध क्षेत्रांतील मान्यवर,शिक्षणतज्ज्ञ,विद्यार्थी आणि नागरिकांकडून संस्थेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## जीवनाचा अर्थ उलगडणारी वारी एकदातरी करावी; ह.भ.प. भगवतीताई दांडेकर यांचे प्रतिपादन; विश्वशांती गुरुकुल, वाखरी येथे प्रवचन

**लातूर/प्रतिनिधी:** वारीमध्ये सहभागी होणारे लहान मोठे सर्व समान असतात. इथे सर्वजण एकमेकांना माऊली म्हणून प्रेमाने संबोधतात. त्यामुळे देह, मन, वाचा, बुद्धी शुध्द होते. वारीतील सर्वसमावेशकतेत जीवनाचा खरा अर्थ उलगडून सांगितला आहे. म्हणून आयुष्यात एकदा तरी वारीला जायला हवे असे प्रतिपादन ह.भ.प. भगवतीताई दांडेकर यांनी केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीच्या वतीने आषाढी वारीचे औचित्य साधून विश्वशांती गुरुकुल, वाखरीतळ येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रवचनात ह.भ.प. भगवतीताई दांडेकर बोलत होत्या.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारतचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या आशीर्वादाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ह.भ.प. चिन्मय महाराज दांडेकर, श्री. काशीराम दा. कराड, माजी मंत्री उल्हास पवार, एमआयटी एडीटी युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. मंगेश कराड, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, प्रा. स्वाती कराड-चाटे आणि सौ. उषा विश्वनाथ कराड आदी मान्यवर उपस्थित होते.

# विभागीय भक्तिगीत गायन स्पर्धेत श्री केशवराज विद्यालयाचे घवघवीत यश

### विभागातून द्वितीय क्रमांकाचे १५०१ रू.चे पारितोषिक प्राप्त

**लातूर/प्रतिनिधी** : येथील जयक्रांती अध्यापक विद्यालय व महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या विभागीय वैयक्तिक भक्ती गीत गायन स्पर्धेत येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाने विभागातून द्वितीय क्रमांकाचे १५०१ /- रूपयांचे पारितोषिक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे. कु. आराध्या आदिनाथ कदम (इ.६ वी अ) व कु.अपूर्वा अमर पाटील (इ.१० वी क) या दोन विद्यार्थिनींच्या उत्तम सादरीकरणामुळे केशवराज विद्यालयास वरील यश प्राप्त झाले आहे.




या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, सहकार्यवाह अमरनाथ खूर्पे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य जितेश चापसी, प्रवीण सरदेशमुख,संजय गुरव,श्री केशवराज शैक्षणिक संकुल अध्यक्ष धनंजय तुंगीकर,कार्यवाह शैलेश कुलकर्णी, शालेय समिती अध्यक्ष गंगाधर खेडकर, मुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे, उपमुख्यध्यापक तथा केंद्रीय विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे, पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर,अंजली निर्मळे,धनंजय कुलकर्णी, राम जोशी, तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी वरील यशस्वी विद्यार्थिनी, त्यांचे पालक व मार्गदर्शक संगीत शिक्षक श्री संतोष बीडकर यांचे हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# ईद-ए-मिलादुन्नबी (स.) जुलूस समिती २०२६ च्या अध्यक्षपदी मेहराज महेबूबपाशा पटेल यांची निवड



धाराशिव(प्रतिनिधी)- धाराशिव शहरातील ईद-ए-मिलादुन्नबी (पैगंबर जयंती) जुलूस समिती (कमेटी) २०२६ च्या अध्यक्षपदी मेहराज महेबूबपाशा पटेल यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. शहरातील इस्लाम धर्माचे शेवटचे पैगंबर हजरत मुहम्मद मुस्तफा सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांच्या जन्मदिनानिमित्त दरवर्षी विविध धार्मिक कार्यक्रम तसेच भव्य जुलूसाचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमांचे यशस्वी नियोजन करण्यासाठी २४ जुलै २०२६ रोजी शहरातील समा हॉल येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.

बैठकीत शहरातील इस्लामी धर्मगुरू, ज्येष्ठ नागरिक, समाजसेवक व विविध मंडळांच्या प्रतिनिधींची उपस्थिती होती. आगामी ईद-ए-मिलादुन्नबी उत्सव शांततापूर्ण, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्याबाबत चर्चा करण्यात आली. त्यानंतर सर्वानुमते मेहराज महेबूबपाशा पटेल यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

यावेळी शहरातील विविध मान्यवरांनी मार्गदर्शन करत जुलूस समितीला शुभेच्छा दिल्या. बैठकीचे सूत्रसंचालन कारी मोहम्मद इस्माईल खान यांनी केले.

जुलूस समिती (कमेटी) २०२६ पदाधिकारी, अध्यक्ष: मेहराज महेबूबपाशा पटेल, उपाध्यक्ष: महम्मद कैफ काझी, उपाध्यक्ष: कलीम कुरेशी, सचिव: सय्यद इरशाद, कार्याध्यक्ष: सय्यद शोएब, कार्याध्यक्ष: सय्यद तय्यब, कॅशिअर: नौमान रुसवी, ,सदस्य: शेख अलीम, अरबाज नदाफ, सय्यद आबेद, इरशाद मुजावर, गुड्डू भाई जेके, सय्यद शहनवाज, निहाल (पप्पू) काझी, अफसर कुरेशी, मोहताशीम कुरेशी, मदनी कुरेशी आणि आदित्य काझी.

नवनिर्वाचित अध्यक्ष मेहराज महेबूबपाशा पटेल यांनी निवडीबद्दल सर्व उपस्थितांचे आभार मानत, सर्वांच्या सहकार्याने ईद-ए-मिलादुन्नबीचा उत्सव शिस्तबद्ध व उत्साहात साजरा करण्याचा विश्वास व्यक्त केला.

# अवैध २ जुगार अड्ड्यावर पोलीसांची कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम राबवत पोलीस पथकाने दिनांक :- २४/०७/२०२६ रोजी दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापेमारी करून 'कल्याण मटका जुगार चालवणाऱ्या व खेळणाऱ्या एकूण १५ इसमांवर कायदेशीर कारवाई केली आहे. या दोन्ही कारवायांमध्ये जुगाराचे साहित्य, रोख रक्कम व मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.

१. पहिली कारवाई (सांजावेस गल्ली, देशपांडे स्टँडजवळ, तुळजापूर रोड) बातमीदारामार्फत मिळालेल्या बातमीच्या आधारे प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक श्री. अमोल मोहिते साहेब व पोलीस निरीक्षक कुमार दराडे साहेब यांच्या पोलीस पथकाने सायंकाळी ४:३० वाजता देशपांडे स्टँडजवळ, तुळजापूर रोड लगत ताज हॉटेलच्या समोर सांजा वेस गल्लीतील पत्राच्या शेडमध्ये धाड टाकली. तेथे जावेद शकील तांबोळी हा लोकांना मटका जुगार खेळवत असताना रंगेहात पकडला गेला. १. जावेद (मुख्य) रा. धाराशिव २. सोहेल, रा. धाराशिव ३. मनोज , रा. आंबेहोळ, ता. जि. धाराशिव ४.दत्ता रा. लामजन, ता. औसा, जि. लातूर ५. बालाजी रा. धाराशिव ६. दिलावर रा. धाराशिव ७. राजू रा. धाराशिव ८. बालाजी मधुकर बोंदर रा. धाराशिव ९. अभिषेक रा. धाराशिव १०. नाना र` रा. धाराशिव जप्त मुद्देमाल:- मटका चिट्ट्या, रोख रक्कम आणि ३ मोबाईल हँडसेट (ओप्पो, व्हीवो, जिओ भारत) असा एकूण रुपये ५९,७००/- चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

२. दुसरी कारवाई (इंदिरा नगर, जे.के. पान टपरीच्या पाठीमागे) दुसऱ्या कारवाईत पोलीस पथकाने सायंकाळी ५:१० वाजता इंदिरा नगर येथील जे. के. पानटपरीच्या पाठीमागे मोकळ्या जागेत धाड टाकली. तेथे आरोपी जाकेर तांबोळी हा लोकांना कल्याण मटका खेळवून कमी पैशात जास्त पैशांचे आमिष दाखवत होता. पोलिसांना पाहून तो जुगाराची वही टाकून पळून गेला, तर जुगार खेळणारे ४ इसम जागेवर सापडले. - १. जाकेर (चालवणारा - फरार), २. रवि ३. सौदागर , ४. विकास ५. सचिन सर्व रा. धाराशिव. जप्त मुद्देमाल:- मटका जुगाराच्या सह्यांच्या चिठ्या, आकड्यांची पिवळी वही व रोख रक्कम असा एकुण १,६२०/- रुपये चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. सदर दोन्ही कारवायां प्रकरणी पोलीस ठाणे धाराशिव शहर येथे महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वरील दोन्ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर मॅडम, धाराशिव मा. अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर साहेब, धाराशिव यांचे मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थी पोलीस उप अधीक्षक श्री. अमोल मोहिते साहेब, पोलीस निरीक्षक श्री. कुमार दराडे, सपोफौ/ ३०० गंजानन कन्हाळे, पोअं/ ६३६ कृष्ण गोपाळ गायकवाड, पोअं/ ३२५ योगेश साहेबराव कांबळे, पोअं/२०४८ एस. बी. नाईकवाडी, चापोह / ४५६ रनावरे व चापो / १८९८ अमित वाघमारे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

# भक्तासाठी विठुराया झाला कुंभार... म्हणूनच काकांचे तेर 'प्रति पंढरपूर'



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- धाराशिव जिल्ह्यातील तेर हे संतश्रेष्ठ गोरोबा काका यांच्या पावन स्मृतींमुळे 'प्रति पंढरपूर' म्हणून ओळखले जाते. आषाढी एकादशीच्या निमित्ताने यंदाही हजारो वारकरी व भाविक संत गोरोबा काकांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी तेरमध्ये दाखल होणार आहेत. या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात दर्शन, वाहतूक, सुरक्षा व भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. संत गोरोबा काका यांचा जन्म इ.स. १२६७ मध्ये तेर येथे झाला. बालपणापासूनच त्यांना विठ्ठलभक्तीची गोडी लागली होती. पुढे त्यांचा विवाह ढोकी येथील संताबाई यांच्याशी झाला. कुंभारकाम करताना विठ्ठलनामात इतके तल्लीन झाले की चिखल तुडविताना त्यांच्या एकुलत्या एक मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रसंगानंतर त्यांच्या जीवनात अनेक कठीण घटना घडल्या. विठ्ठलाच्या शपथेचा मान राखण्यासाठी त्यांनी पत्नीला स्पर्श न करण्याचा संकल्प केला. पुढे परिस्थितीमुळे स्वतःचे दोन्ही हात तोडल्याची कथा संतपरंपरेत सांगितली जाते.

लोकपरंपरेनुसार, भक्ताच्या संकटाची जाणीव होताच श्री विठ्ठल आणि रुक्मिणी यांनी कुंभार-कुंभारणीचा वेश धारण करून तेरमध्ये येत गोरोबा काकांचे काम स्वतः केले. गाढवावर माती आणणे, चिखल तयार करणे आणि गाडगे-मडकी घडविणे अशी सेवा त्यांनी केल्याची आख्यायिका वारकरी संप्रदायात प्रसिद्ध आहे. त्यामुळे तेरला 'प्रति पंढरपूर' म्हणून विशेष मान मिळाला आहे. पुढे पंढरपूर येथे संत नामदेवांच्या कीर्तनावेळी गोरोबा काकांनी थोटे हात वर करून हरिनाम घेताच विठ्ठल-रुक्मिणीच्या कृपेने त्यांना पुन्हा हात प्राप्त झाल्याचा उल्लेख संतचरित्रात आढळतो. भक्ती, समर्पण आणि परमेश्वराच्या कृपेचे हे उदाहरण वारकरी परंपरेत आजही श्रद्धेने सांगितले जाते.

गोरोबा काकांनी इ.स. १३१७ मध्ये तेर येथील पुरातन कालेश्वर मंदिराजवळ समाधी घेतली. दर महिन्याच्या एकादशीला येथे मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. चैत्र वद्य एकादशीपासून अक्षय तृतीयेपर्यंत वार्षिक यात्रा महोत्सव भरतो, तर कार्तिक महिन्यात त्यांची पालखी पंढरपूरला प्रस्थान करते. तेर येथील त्यांचे राहते घर, समाधी मंदिर आणि विठ्ठल-रुक्मिणी मंदिर भाविकांसाठी श्रद्धेची केंद्रे आहेत.

# तेर परिसरात वारकऱ्यांसाठी भाकरी व बेसनपीठ संकलन



तेर -आळंदी येथून पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी निघालेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना भाकरी व बेसन वाटप करण्यासाठी तेर येथे भाकरी व बेसनपीठ संकलन उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम आर्ट ऑफ लिव्हिंग ग्रुप, तेर यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

तेर येथे आचार्य कुटुंबातील पाचव्या पिढीपासून अखंडपणे सुरू असलेल्या श्रीमद्भागवत सप्ताहास उत्साहात प्रारंभ झाला. दि. २३ जुलै रोजी सकाळी श्रीमद्भागवत सप्ताहाच्या प्रारंभी पुणे येथील सुभाष कुलकर्णी यांच्या हस्ते गणेशपूजन व पुण्याहवाचन विधी संपन्न झाला. त्यानंतर संहितावाचन करण्यात आले. दुपारच्या सत्रात ह.भ.प. बाळासाहेब महाराज आचार्य यांनी भागवताचे अर्थनिरूपण केले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने भाविक-भक्त उपस्थित होते.

या संकलन उपक्रमाला तेर ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणावर भाकरी व बेसनपीठ जमा केले. संकलित करण्यात आलेले साहित्य पालखीच्या मुक्कामस्थळी वारकऱ्यांना वितरित करण्यात येणार आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सुनिता पांचाळ, भाग्यश्री भक्ते, आशा माळी, गीता नाईकवाडी, सुमन नाईकवाडी, उर्मिला पांचाळ, ओम नाईकवाडी, विजयसिंह फंड, नारायण साळुंके, बबन कोकरे आदींनी परिश्रम घेतले.

# ४ लाख हेक्टरवर पेरा; बाजरी, मका ठरणार आधार

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-यंदा मान्सून उशिराने दाखल झाल्याने पेरणीही लांबवणीवर गेली आहे. २३ जुलैपर्यंत ४ लाख हेक्टरवर पेरा झाला आहे. मूग, उडीद, सोयाबीन पेरणीची डेडलाइन संपली आहे. उशिरा पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर सोयाबीनमध्ये तूर आंतरपीक घेण्याचा पर्याय उपलब्ध आहे. ३१ जुलैपर्यंत अशा पद्धतीने पेरणी करता येणार आहे. त्यानंतर शेतकऱ्यांना सूर्यफूल, तूर, बाजरी, तीळ असे पीके घ्यावी लागणार आहेत. खरीप हंगामात कृषी विभागाने ५ लाख ५४ हजार हेक्टर क्षेत्र पेरणीसाठी प्रस्तावित केलेले आहे. जून महिन्यात पाऊस उशिराने दाखल झाल्याने पेरणही खोळंबली होती. जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पावसाने हजेरी लावल्याने पेरणीस वेग आला होता. त्यानंतर तब्बल बारा दिवस पावसाने उघडीप दिली. त्यामुळे पुन्हा पेरणीस ब्रेक बसला होता. मागील तीन दिवसापासून पाऊस हजेरी लावत असल्याने जमिनीत ओलावा निर्माण होत असल्याने बळीराजाने पेरणी उरकून घेण्यास प्राधान्य दिले आहे. २३ जुलैपर्यंत ४ लाख ७५४ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. यात सर्वाधित ३ लाख ५६ हजार हेक्टर क्षेत्र सोयाबीन पिकाने व्यापले आहे. आता मूग, उडीद, सोयाबीन पेरणीची मुदत संपल्याने शेतकरी सोयाबीन पिकामध्ये आंतरपीक तूर घेत आहेत. अशा पद्धतीची पेरणीही शेतकऱ्यांना ३१ जुलैपर्यंत करता येणार आहे. त्यानंतर शेतकऱ्यांना मात्र, बाजरी, मका, सूर्यफूल, तीळ अशा पिकांना पसंती द्यावी लागणार आहे. डॉ. सचिन सूर्यवंशी, मृदा व जलव्यवस्थापन तज्ज्ञ

शेतकऱ्यांना ३१ जुलै पर्यंत सोयाबीन पिकांत तूर पीक अंतरपीक घेता येणार आहे. ऑगस्ट महिन्यात शेतकऱ्यांना बाजरी, तीळ, सूर्यफूल अशी कमी कालावधीची व कमी पाण्यावर जगणारी पिके घ्यावीत. परतीच्या पावसाने नुकसान टळण्यासाठी तूरीची लागवड करावी.

# जळकोट येथील श्री कॉम्प्युटर्सच्या संचालकांचा सौ.ज्योती पाटील यांचा एमकेसीएलकडून सन्मान



जळकोट (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अग्रगण्य श्री कॉम्प्युटर्सचे संचालक श्री. लक्ष्मीकांतजी पाटील व संचालिका सौ. ज्योती पाटील यांचा क्लिक कोर्सेस यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल एमकेसीएल तर्फे छत्रपती संभाजीनगर येथे विशेष सन्मान करण्यात आला. या उल्लेखनीय यशामुळे जळकोटच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव वाढला असून, त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार संगणक शिक्षण व आधुनिक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यासाठी श्री कॉम्प्युटर्स सातत्याने कार्यरत असून, हा सन्मान त्यांच्या गुणवत्तापूर्ण सेवेला मिळालेली योग्य पावती मानली जात आहे. या यशाबद्दल श्री. लक्ष्मीकांतजी पाटील व सौ. ज्योती पाटील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी व नागरिकांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पोदार प्रेपमध्ये पालकांनी जाणून घेतला पाल्याचा शैक्षणिक प्रवास

पोदार प्रेप, धाराशिव येथे पालकांसाठी पोर्टफोलिओ मीटचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात शिक्षकांनी पालकांशी वन-टू-वन संवाद साधत विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास, त्यांची प्रगती, क्षमता, कौशल्ये आणि सर्वांगीण विकास याविषयी सविस्तर माहिती दिली. शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या पोर्टफोलिओद्वारे त्याच्या शिकण्यातील प्रगती, विविध उपक्रमांमधील सहभाग तसेच भविष्यातील विकासाच्या संधी याविषयी अर्थपूर्ण मार्गदर्शन केले. शिक्षकांनी दिलेल्या तपशीलवार आणि समर्पक माहितीमुळे पालकांनी समाधान व्यक्त करत या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिवचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांनी पालक व शिक्षक यांच्यातील सातत्यपूर्ण संवाद विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले. तसेच अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेण्यास पालकांना मदत होत असून शाळा व पालक यांच्यातील नाते अधिक दृढ होत असल्याचे त्यांनी नमूद केले. डमिन ऑफिसर जीवन कुलकर्णी सर यांनीही पालकांशी सातत्यपूर्ण संवाद आणि शाळा-पालक यांचे सहकार्य विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगत अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच पोदार प्रेप, धाराशिवच्या मुख्याध्यापिका रेश्मा संकपाळ मॅडम यांनी सांगितले की, अशा उपक्रमांना पालकांचा लाभत असलेला सकारात्मक प्रतिसाद व उत्साह आम्हाला अधिक जोमाने कार्य करण्यास प्रोत्साहित करतो. आपल्या सातत्यपूर्ण सहकार्यामुळेच आमची शैक्षणिक वाटचाल अधिक समृद्ध होत आहे, असे सांगून त्यांनी उपस्थित पालकांचे आभार मानले.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**
**9175325708**
**9284321472**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649